# परशुरामीय

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड
तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥

वर्ष ४७ ] ऑक्टोबर १९६२ [ अंक पहिला


## संपादकीय समालोचन

**वर्षारंभ :**

या वर्षी महाविद्यालयाचा वर्षारंभ ता. २१ जून या दिवशीं झाला. त्या दिवशीं दुपारीं प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर यांचें प्रारंभिक भाषण झालें. सर्व विद्यार्थ्यांचें स्वागत केल्यानंतर त्यांनीं, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं मिळविलेलें सुयश, विद्यापीठाच्या निरनिराळ्या परिक्षांमध्यें आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं मिळविलेले उच्च श्रेणीचे क्रमांक, पारितोषिकें इत्यादींबाबत माहिती सांगितली. तसेंच विद्यार्थीहित-संवर्धनाच्या दृष्टीनें महाविद्यालयानें आंखलेल्या योजनांची सविस्तर माहिती सांगून विद्यार्थ्यांनीं ह्या योजनांचा जास्तींत जास्त फायदा करून घ्यावा व आपली सर्वांगीण प्रगति करून घ्यावी असा उपदेश केला. अभ्यास आणि खेळ, ह्या दोन्ही क्षेत्रांत प्रगति करून घेऊन भावी काळामध्यें जे साध्य करावयाचें असेल त्याचा पाया ह्याच वेळीं घातला पाहिजे असेंहि त्यांनीं सुचविलें. त्यानंतर चालू शैक्षणिक वर्षाचे उद्‌घाटन समारंभादिनीं माजी प्राचार्य शं. वा. ऊर्फ सोनोपंत दांडेकर यांचें भाषण झालें. त्यावेळीं त्यांनीं “ आपल्या मुलाला डॉक्टर करणार, वकील बनविणार, असें सर्व लोक म्हणतात, पण त्याला खरा मानव कोणी बनवीत नाहीं. माणसाचें जीवन गंगेसारखें असावें, त्यानें खऱ्याखुऱ्या अर्थानें मानव बनावें. ” असे उद्गार काढले व विद्यार्थ्यांना उद्देशून “ गंगेसारखें जीवन असूं द्या, निर्मळ आणि उपकारक. तुम्ही कोणीहि व्हा, परंतु मानव बना ” असा जिव्हाळ्याचा उपदेश केला. त्यानंतर प्रीडिग्री परीक्षेंत पहिले आलेले श्री. संजय कोल्हटकर यांना १०० रु. रोख आणि श्रीफळ, तसेंच श्री. दिलीप करंदीकर आणि श्री. विजय सरनाईक यांना प्रत्येकीं ५० रु. रोख व श्रीफळ प्राचार्य दांडेकर यांच्या हस्तें देण्यांत आलें. त्याच वेळीं अमेरिकेहून परत आलेले प्रा. डॉ. कावळे यांचेंहि अभिनंदन करण्यांत आलें.

**नव्या नेमणुका :**

आपल्या महाविद्यालयांत या वर्षी खालील प्राध्यापकांची नेमणूक झाली आहेः ( १ ) प्रा. सौ. अनुराधा पोतदार; एम्. ए. पीएच्. डी.–मराठी ( २ ) प्रा. व्हॉ. एम्. मिरासदार, एम्. ए. ( द्वितीय श्रेणी )–इंग्रजी. ( ३ ) प्रा. पां. सो. चौधरी, एम्. एस्सी.–गणित. ह्या सर्व प्राध्यापकांचें आम्ही मनःपूर्वक स्वागत करतों.

**प्राध्यापकांचें ग्रंथलेखन :**

**प्रा. रा. म. गोखले :** प्रा. गोखले यांचें ‘ आधुनिक राज्यशास्त्र भाग पहिला. ’ हें बी. ए. करितां लिहिलेलें पाठ्यपुस्तक प्रसिद्ध झालें. तसेंच ‘ अर्थशास्त्र–परिचय ’ ह्या ग्रंथाची चौथी आवृत्तीहि याच वर्षी प्रसिद्ध झाली.

**प्रा. रा. ना. गद्रे :** प्रा. गद्रे यांनीं संपादन केलेल्या विश्वनाथकृत साहित्यदर्पण ( परिच्छेद १, २ व १० अर्थालंकार ) या ग्रंथाच्या संपूर्ण मराठी आवृत्तीला पुणें विद्यापीठानें रु. १००० इतकें आर्थिक सहाय्य केलें. प्रा. रा. ब. आठवले यांना ग्रंथाचे परीक्षक नेमलेले होते. त्यांच्या शिफारसीनुसार हें सहाय्य देण्यांत आलें.

**प्रा. पी. ए. पुरोहित :** प्रा. पुरोहित यांनीं प्रा. क्षीरसागर व प्रा. वरूटे यांच्या सहकार्यानें प्री–प्रोफेशनल आणि प्रथम वर्ष बी. एस्सी. करितां लिहिलेलें पाठ्यपुस्तक ‘ A Class Book of Zoology ’ ह्या वर्षी प्रसिद्ध झालें.

**प्रा. डॉ. शं. रं. देशपांडे यांनीं मिळविलेलें यश :** आपल्या महाविद्यालयांतील प्राध्यापक शं. रं. देशपांडे यांनीं वनस्पतीशास्त्र या शाखेंत संशोधन करून डॉक्टरेट ही पदवी मिळविली. त्यांनीं पुणें विद्यापीठ वनस्पतीशास्त्र–विभाग प्रमुख डॉ. महाबळे यांच्या मार्गदर्शनाखालीं संशोधन कार्य करून पीएच्. डी. ही पदवी मिळविली. मध्यप्रदेशांतील मोहगांव व सागर आणि गुजरात मधील धळा ह्या ठिकाणीं सांपडणाऱ्या शिलांग-

भूत वनस्पतींचे अवशेष ( Plant Fossilo ) हा त्यांचा संशोधन विषय होता. पुणें विद्यापीठांत वनस्पतीशास्त्राच्या या शाखेंत ( Palaeobotany ) संशोधन करून पदवी मिळविणारे डॉ. देशपांडे हे पहिलेच संशोधक आहेत. अमेरिकेंतील मिचिगन युनिव्हर्सिटीचे प्रो. सी. ए. अर्नोल्ड व पॅरीस येथील प्रो. इ. बुरो यांच्यासारख्या जगप्रसिद्ध अधिकारी शास्त्रज्ञांनीं ह्या संशोधनकार्याची प्रशसा 'A Valuable new contribution to the science of Palaeobotany' अशा शब्दांत केली आहे. प्रा. डॉ. देशपांडे यांनीं केलेल्या संशोधन-कार्याबद्दल आणि मिळविलेल्या यशाबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## प्रा. डॉ. श्री. र. कावळे यांचें अमेरिकेहून आगमन

प्रा. डॉ. कावळे गेल्या वर्षी डॅन्फोर्थ फौंडेशनची शिष्यवृत्ति मिळवून अमेरिकेस संशोधन व अध्यापन-कार्य करण्यासाठीं गेले होते. आपलें अंगीकृत कार्य यशस्वी रीतीनें पूर्ण करून ते चालू वर्षी १८ जून रोजीं भारतांत परत आले. महाविद्यालयाच्या वर्षारंभ प्रसंगीं केलेल्या भाषणांत सन्मान्य पाहुणे प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनीं डॉ. कावळे यांचें सर्वांच्या वतीनें हार्दिक स्वागत केलें.

अमेरिकेंतील आपल्या एक वर्षाच्या मुक्कामांत डॉ. कावळे यांनीं कोलगेट विद्यापीठ, हॅमिल्टन, न्यूयॉर्क येथें तत्त्वज्ञान आणि धर्म या विषयाचें अध्यापन केलें आणि सुप्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञ जॉन डयूई यांच्या तत्त्वज्ञानासंबंधीं संशोधन केलें. कोलगेट विद्यापीठानें डॉ. कावळे यांना तेथील वसतिगृहाच्या एका विभागाचे 'विद्यार्थी सल्लागार' म्हणून काम पाहाण्याची संधि दिल्यामुळें त्यांना कोलगेट विद्यापीठांतील विद्यार्थी जीवनाचा जवळून व प्रत्यक्षपणें परिचय झाला. तसेंच विद्यापीठाच्या प्रशासन विषयक कामाची त्यांना कल्पना यावी म्हणून तेथील अधिकारी मंडळींनीं डॉ. कावळे यांना कांहीं विशेष सवलती दिल्यामुळें त्यांना विद्यापीठाच्या कारभाराचीं विविध अंगें अभ्यासितां आलीं.

अमेरिकन फिलॉसॉफिकल असोसिएशन, एशियन स्टडीज् असोसिएशन, अमेरिकन् स्टडीज् असोसिएशन इत्यादिकांच्या परिषदांना उपस्थित राहून त्यांनीं चर्चेत भाग घेतला; हार्वर्ड, शिकागो, येल, कॉर्नेल, पेन्सिल्व्हेनिया इ. ख्यातनाम विद्यापीठांना भेटी दिल्या आणि न्यूयॉर्क स्टेटमधील कांहीं शाळा कॉलेजांना भेटी देऊन भारतीय संस्कृति व तत्त्वज्ञान या विषयावर व्याख्यानें दिलीं व चर्चात्मक कार्यक्रम सादर केले; तसेंच 'स्टूडंट गव्हर्मेंट' सारख्या विद्यार्थ्यांत शिस्त व जबाबदारीची जाणीव निर्माण करणाऱ्या योजनांचा परिचय करून घेतला.

डॉ. कावळे यांच्या कामगिरीविषयीं प्राचार्य हुल्याळकर यांना डॅन्फोर्थ फौंडेशन व कोलगेट विद्यापीठांतील प्राध्यापक व अधिकारी यांचीं अनेक प्रशंसापर पत्रें आलीं आहेत. डॉ. केनेथ मॉर्गन लिहितात, "We have had many foreign visitors here but never a man who worked as hard as Dr. Kawle has to make sure that he understood what we are trying to do and who made the effort to participate in our community life as successfully as he has." कोलगेट विद्यापीठाचे डीन डॉ. स्टोअरिंग लिहितात, "We have never had a visitor who so genuinely and constructively made himself a part of our educational community as Dr. Kawle has. He and his contribution to the college will not soon be fergotten."

भारतामध्यें परत आल्यानंतर डॉ. कावळे यांनीं निरनिराळ्या संस्थांतून Impressions of the Study tour of U. S., A. Student life in American Universities, Philosophy in American Universities, My Impressions of U. S. Libraries, अमेरिकेंतील माध्यमिक शिक्षण, अमेरिकेंतील जीवन व शिक्षण, नव्या जगाचें स्वरूप व समस्या इ. विषयांवर व्याख्यानें दिलीं व चर्चा केली.

डॉ. कावळे यांनीं अमेरिकेंत शिक्षण क्षेत्रांतील कार्याचा जो विविध अनुभव संपादित केला आहे व इंग्लंड, फ्रान्स इ. युरोपमधील देशांमधून जें अवलोकन केलें आहे, त्याचा आपल्या महाविद्यालयाला व पर्यायानें इतर शिक्षणसंस्थांना चांगला फायदा होईल अशी आम्हास खात्री वाटते.

## लो. टिळक पुण्यतिथि :

या वर्षी आपल्या महाविद्यालयांत १ ऑगस्ट रोजीं नेहमींप्रमाणेंच टिळक पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. या पुण्यतिथीला आजपर्यंत ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर, न्या. मू. गजेंद्रगडकर, स्वा.वीर सावरकर, न्या. मू. नाईक, डॉ. धनंजयराव गाडगीळ, प्रा. द. गो. कर्वे, रा. बाबासाहेब खापर्डे, यांच्यासारख्या थोर पुरुषांनीं येऊन विद्यार्थ्यांना लोकमान्यांच्या जीवनाचें रहस्य उकलून दाखविलें आहे. यंदाच्या वर्षीहि अशीच पर्वणी विद्यार्थ्यांना लाभली. या वर्षी महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री

श्री. स. गो. बर्वे यांचें लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त 'विकास योजनेची वाटचाल' ह्या विषयावर भाषण झालें. वादसभेच्या कार्याचा प्रारंभहि याच दिवशीं होऊन श्री. बर्वे यांनीं वादसभेचें उद्‌घाटन केलें. प्राचार्य हुल्याळकर यांनीं श्री. बर्वे यांचें आपल्या महाविद्यालयातर्फे हार्दिक स्वागत केलें; व कांहीं जिव्हाळ्याच्या गोष्टींचें निवेदन केलें. प्राचार्य हुल्याळकर यांनीं केलेलें भाषण ह्या अंकांत इतरत्र दिलेलें आहेच. आपल्या भाषणांत अर्थमंत्री म्हणाले, "विकास हें कांहीं पार्सल नव्हे कीं, तें प्रत्येकाच्या घरीं आपोआप पाठविलें जाईल. विकासासाठीं केवळ सरकारनेंच नव्हे तर जनतेनेंहि प्रयत्न केले पाहिजेत. लोकांनींच जागृत राहून व स्वार्थ बाजूला सारून, विकासाच्या कार्यांत मदत केली पाहिजे. वाढत्या लोकसंख्येमुळें नियोजनानें कितीहि उद्दिष्टें गांठलीं तरी तीं कमी पडत आहेत. लोकसंख्या आणि नियोजन यांचा पाठशिवणीचा खेळ सुरू झालेला आहे. ही परिस्थिति आटोक्यांत आणली पाहिजे. नियोजनाच्या पहिल्या कांहीं वर्षांत भांडवली वस्तूंचें उत्पादन करावें लागत असल्यामुळें करवाढ आणि उपभोग्य वस्तूंच्या किंमतींत वाढ ही अपरिहार्य असते. तरीहि ह्यापुढें करवाढ होणार नाहीं आणि किंमतीहि आटोक्यांत ठेवण्यांत येतील." आपल्या भाषणाच्या शेवटीं माननीय अर्थमंत्र्यांनीं महाराष्ट्र हें भारतांतील एक मजबूत राज्य बनेल असा आशावाद व्यक्त केला. याच वेळीं श्री. बर्वे यांच्या हस्तें आपल्या महाविद्यालयाची उच्च परंपरा राखणाऱ्या हुषार विद्यार्थ्यांचा आणि उच्च शिक्षणासाठीं परदेशीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यांत येऊन निरोप देण्यांत आला या समारंभास बहुसंख्य विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

### स्वातंत्र्य-दिन :

दरवर्षीप्रमाणें आपल्या महाविद्यालयांत १५ ऑगस्ट १९६२ रोजीं पंधरावा वार्षिक स्वातंत्र्य-दिनोत्सव साजरा करण्यांत आला. ध्वजवंदन व प्रतिज्ञा हा कार्यक्रम झाल्यानंतर प्राचार्य हुल्याळकर यांनीं स्वातंत्र्यदिनाचें महत्त्व समजावून सांगितलें. ते म्हणाले, "स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळें आपल्यावर अनेक जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. आज जी प्रतिज्ञा आपण उच्चारली आहे, त्यानुसार भरतभूमि मानवतेला शांतता व समृद्धि प्राप्त करून देण्यास समर्थ व्हावी म्हणून भरतभूमीच्या व तिच्या जनतेच्या सेवेस वाहून घेण्याची आपण शपथ घेतलेली आहे. प्रत्येकानें मानवजातीकरितां कांहींतरी केलें पाहिजे हें भारतीय ऋषींनीं पूर्वींच सांगितलेलें आहे. आपल्या महाराष्ट्रांत आतां लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू झालेला आहे. पंचायत राज्याच्या स्थापनेमुळें आपल्या हातीं सत्ता आलेली आहे. ती योग्य तऱ्हेनें वापरून आपण केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल भारताच्या प्रगतीस हातभार लावला पाहिजे. विद्यार्थ्यांनीं सुद्धां आपल्यापुढें एखादा विशिष्ट आदर्श ठेवून त्या दृष्टीनें कष्ट घेतले पाहिजेत आणि स्वार्थत्याग केला पाहिजे." ह्या कार्यक्रमाच्या प्रारंभीं ध्वजवंदनाच्या वेळीं 'जनगणमन' आणि शेवटीं 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत सांघिक रीतीनें म्हणण्यांत आलें.

## — परीक्षांचे निकाल —

— १९६२ मार्च-एप्रिल परीक्षांचे निकाल —

| इयत्ता | किती बसले ? | पहिला वर्ग | दुसरा वर्ग | पास वर्ग | एकूण यशस्वी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| पदवीपूर्व साहित्य | ५८९ | २ | ८८ | १९६ | २८६ | ४९·३९ |
| पदवीपूर्व शास्त्र | ६३२ | ३२ | १९७ | १४७ | ३७६ | ६०·१६ |
| प्री प्रोफेशनल | २७४ | २६ | १०१ | २५ | १५१ | ५५·४ |
| पदवी प्रथमवर्ष साहित्य | २८३ | — | — | — | १५७ | * |
| पदवी प्रथमवर्ष शास्त्र | १७ | — | — | — | ५ | * |
| बी. ए. स्पेशल ( नवा अभ्यासक्रम ) | ३०८ | १० | १०८ | ६० | १७८ | ५८ |
| बी. ए. जनरल ( नवा अभ्यासक्रम ) | ४ | -- | -- | १ | १ | २५ |
| बी. ए. स्पेशल ( जुना अभ्यासक्रम ) | ५१ | ० | १५ | २२ | २७ | ५३ |
| बी. ए. जनरल ( जुना अभ्यासक्रम ) | ५ | — | -- | १ | १ | २० |
| बी. एससी. जनरल ( जुना अभ्यासक्रम ) | ९८ | ० | २० | २४ | ४४ | ४४ |
| बी. एससी. ( नवा अभ्यासक्रम ) | १४६ | १८ | ४७ | ८ | ७३ | ५० |

* [ नवीन त्रिवर्ष पदवी अभ्यासक्रमानुसार ह्या विद्यार्थ्यांचे वर्ग व टक्केवारी तिसऱ्या वर्षाच्या शेवटीं प्रसिद्ध केली जाते.

**शिष्यवृत्त्या व पारितोषिकें :**

**पदवीपूर्व परीक्षा :** श्री. संजय वासुदेव कोल्हटकर पदवीपूर्व परिक्षेंत सर्व विद्यापीठांत पहिल्या वर्गांत पहिला आला. तसेच श्री. दिलीप वासुदेव करंदीकर यांनीं विज्ञानशास्त्राचे प्रो. एन्. के. आपटे पारितोषिक मिळविलें.

**प्री–प्रोफेशनल परीक्षा :** श्री. व्ही. आर्. सरनाईक यानें गणित विषयांत रँग्लर आर्. पी. परांजपे गणित शिष्यवृत्ति मिळविली.

**प्रथम वर्ष बी. ए. परीक्षा :** श्री. भा. ब. फडके लोकमान्य टिळक संस्कृत शिष्यवृत्ति मिळविली.

## — प्रथम श्रेणीचे मानकरी —

**बी. ए. स्पेशल** ( नवीन अभ्यासक्रम ) **परीक्षा :**

सर्वश्री. आर्. एस्. कुलकर्णी. ( पहिल्या वर्गांत प्रथम क्रमांक ), अलका. डी. बियाणी, मेघमाला एस्, नामले, पुष्पा एम्. फाटक, पुष्पा पी. आगाशे, एस्. टी. गाडगीळ, मंदाकिनी. एस्. आगाशे, ए. एन्. अकलुजकर, जे. आर्. जोशी, आर्. व्ही. आगरवाल.

**बी. ए. जनरल** ( नवीन अभ्यासक्रम ) **परीक्षा :**

कु. मीनाक्षी. व्ही. पटवर्धन.

**बी. एस्.सी.** ( नवीन अभ्यासक्रम ) **परीक्षा :**

सर्वश्री. लीला ना. भिडे, अ. रा. चांदोरकर, उषा ज. गद्रे, शकुंतला ल. घाटपांडे, र. मा. पटवर्धन, अ. म. नंदकर, शीला मो. प्रधान, श्री. पु. साठे, सुशीला भ. सोमण, विजया सी. अळेकर, नीला चं. पेंडसे, सु. वि. बापट, अ. द. दीक्षित, ज. रा. जोशी, र. त्र्यं. देशपांडे, म. त्रिं. फडके, श. गि. पित्रे, आशा ज. कर्वे.

**प्री–प्रोफेशनल परीक्षा :**

सर्वश्री. डी. व्ही. भिडे, एस्. एस्. देवधर, के. एस्. गोखले, ए. के. हिंगवे, आर् व्ही. जळगांवकर, एस्. बी. जोशी, व्ही. आर्. जोशी, एस्. जी. कांगो, आर्. एच्. कुलकर्णी, एम्. एम्. कुंटे, एस्. जे. महाजन, आशालता एन्. नांदेडकर, जी. एन्. नवरे, पी. ए. ओक, एन्. एन्. ओझरकर, एस्. एस्. पालकर, एम्. एम्. पुरंधरे, पी. एन्. राजोपाध्ये, आर्. के. रत्नपारखी, व्ही. आर्. सरनाईक, ए. एन्. दामले, सुनंदा आर्. गोडे, ए. डी. जोशी, नीला पी. कुलकर्णी, एस्. आर्. पेंडसे, ए. एन्. पुजारी.

**पदवीपूर्व साहित्य :**

कु. आशा आत्माराम भट, कु. सुधा श्रीधर जोगळेकर.

**पदवीपूर्व शास्त्र :**

सर्वश्री. व्ही. आर्. म्हैसकर, जी. एन्. तांबे, एस्. जी. थत्ते, के. व्ही. अरगडे, पी. व्ही. भागवत, के. जी, देशपांडे, व्ही. व्ही. जोशी, एस्. डी. कोंडेजकर, आर्. डी. क्षीरसागर, एस्. जी. पुरोहित, व्ही. आर्. सिधये. व्ही. आर्. तोरावणे, व्ही. एम्. वाघ, एस्. आर्. यादवाडकर, सरोज जी. कुलकर्णी, ए. एम्. लुनावत, एस्. व्ही. अकोलकर, के. यू. आपटे, एस्. व्ही. काळे, विजयलक्ष्मी, डी. मिजार, ए. एम्. घारपुरे, ए. डी. जतकर, एन्. डी. जोग, पी. पी. जोशी, व्ही. के. जोशी, लता बी. कानिटकर, व्ही. डी. पंडित, एस्. एम्. सरवटे, डी. व्ही. करंदीकर, एस्. व्ही. कोल्हटकर, उषा एम्. ताम्हनकर, एच्. व्ही. जोशी.

**' बी ' सर्टिफिकेट परीक्षा :**

श्री. अशोक गोपाळ टिळक, ३२ एन्. सी. सी. रायफल्स् बी. सर्टिफिकेट परीक्षा प्रथम क्रमांक.

## आमच्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाकरितां परदेशीं प्रयाण :

कु. **नलिनी. श्री. हुल्याळकर :** अमेरिकेंतील नॉर्थ कॅरोलिना संस्थानांतील शारलोट शहरीं असलेल्या जग-प्रसिद्ध क्वीन्स कॉलेजची शिष्यवृत्ति मिळवून उच्च शिक्षणा-करितां कु. हुल्याळकर ह्या अमेरिकेस गेल्या. हें विद्यार्थि-नींचें कॉलेज असून निवडक अशा ५०० विद्यार्थिनींना फक्त प्रवेश दिला जातो. दरवर्षी ५–६ शिष्यवृत्त्या परदेशी विद्यार्थिनींना दिल्या जातात. अशी शिष्यवृत्ति मिळवून अमेरिकेस जाणाऱ्या कु. हुल्याळकर ह्या पहिल्याच भारतीय विद्यार्थिनी आहेत. अमेरिकेस जाण्यापूर्वी त्या द्वितीय वर्ष बी. ए. च्या वर्गांत शिकत होत्या. त्या क्वीन्स कॉलेजमध्यें तीन वर्षें राहणार असून तेथें ' Clynical Psychology ' चा विशेष अभ्यास करून पदवी संपादन करणार आहेत.

**श्री. रवींद्र कुलकर्णी :** श्री. कुलकर्णी हे अमेरिकें-तील सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठांत गणित विषयाच्या उच्च अभ्यासासाठीं गेले असून गणित विषयांत एम्. ए. व पीएच्. डी. ह्या पदव्या मिळविण्याचा त्यांचा मानस आहे. दरवर्षी तीन हजार डॉलर्सची शिष्यवृत्ति तीन वर्षांकरितां त्यांना मिळालेली आहे. श्री. कुलकर्णी यांनीं एस्. एस्. सी. पासून बी. ए. पर्यंतच्या सर्व परीक्षांत प्रथम श्रेणी आणि प्रथम क्रमांक मिळविला. बी. ए. च्या परिक्षेंत ८८ टक्के गुण मिळवून ते उत्तीर्ण झाले. नू. म. वि. हायस्कूल आणि स. प. महाविद्यालय ह्या संस्थांतून

त्यांचें शिक्षण झालें आणि त्यांनीं आपल्या महाविद्यालयाच्या यशांत भर घातली.

**श्री. श्रीपाद गोपाळ पेंडसे :** अमेरिकेंतील नॉक्स कॉलेजची शिष्यवृत्ति मिळवून Business Administration च्या अभ्यासाकरितां श्री. पेंडसे हे अमेरिकेस गेले असून तेथें ते चार वर्षें राहाणार आहेत. ते अमेरिकेस जाण्यापूर्वी द्वितीय वर्ष बी. ए. ह्या वर्गात शिकत होते. नूतन मराठी विद्यालयांतून एस्. एस्. सी. परिक्षेंत त्यांनी आठवा क्रमांक मिळविला होता. तसेच पदवीपूर्व व प्रथम वर्ष बी. ए. ह्या परिक्षांतहि प्रथम श्रेणीचें यश संपादन केलें होतें.

**श्री. देव, श्री. रत्नपारखी, कु. विजया साठे :** श्री. प्रकाश कृष्ण रत्नपारखी, श्री. देव व कुमारी विजया साठे यांची अमेरिकन फील्ड सर्व्हिस प्रोग्रॅमसाठीं इंडिया फौंडेशनमार्फत निवड करण्यांत आली. अखिल भारतांतून निवडलेल्या १५ विद्यार्थ्यांपैकीं ३ विद्यार्थी आपल्या महाविद्यालयांतील आहेत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. एक वर्षभर अमेरिकन कुटुंबांत राहून तेथील शालेय शिक्षणक्रमांतील शेवटच्या वर्षाच्या वर्गात ह्या तीनहि विद्यार्थ्यांनीं अभ्यास करावयाचा आहे. आंतरराष्ट्रीय सहजीवनाच्या ह्या प्रयोगांतून आपल्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक व विशाल होईल आणि त्याबरोबरच भारत आणि अमेरिका यांच्यांतील संबंध अधिक दृढ होतील अशी अपेक्षा आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना १ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री स. गो. बर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या वतीनें निरोप व आशीर्वाद देण्यांत आला. आपल्या महाविद्यालयाच्या कीर्तींत भर घालणाऱ्या ह्या विद्यार्थ्यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतो.

### वक्तृत्व स्पर्धेतील यश :

' महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा ' या संस्थेतर्फे यंदा सुरू करण्यांत आलेल्या ' महाराष्ट्र–गुजराथ संयुक्त हिंदी वक्तृत्व स्पर्धेत ' आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थी श्री. अनिल मधुकर घारपुरे यानें विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाचें पारितोषिक मिळविलें. त्याचा स्पर्धेचा विषय ' पंचायत राज्य ' हा होता. कुमार घारपुरे याचें हार्दिक अभिनंदन.

### कु. मीना यादव यांची झुरिक येथें भरलेल्या जागतिक ' गर्ल गाईड्स ' मेळाव्याकरितां निवड :

स्वित्झलँडमध्यें भरणाऱ्या ज्युलिएट लो सेशनसाठीं प्रत्येक देशांतील दोन विद्यार्थिनी ( गर्ल गाईड्स् ) निवडावयाच्या होत्या. त्यामध्यें भारतातर्फे आपल्या महाविद्यालयांतील कु. मीना यादव यांची निवड झालेली होती. ही परिषद् स्वित्झर्लंड मधील Adelboden या गांवीं १७ जुलै ते ७ ऑगस्टपर्यंत भरली होती. ह्या परिषदेचा उद्देश मैत्रीचे संबंध जोडले जावे असा होता. तेथील वास्तव्यांत कु. यादव यांनीं भारताचें प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी पार पाडली. परिषद संपल्यानंतर हॅरो येथील गर्ल गाईड्स्च्या आमंत्रणानुसार भारताच्या ह्या दोन पाव्हण्या गर्ल गाईडस्नी लंडनमध्यें दहा दिवस मुक्काम केला आणि एक महिन्याचा परदेशचा दौरा आटोपून १९ ऑगस्टला कु. मीना यादव व भारताच्या दुसऱ्या गर्ल गाईड ह्या दोन्ही भारतांत परत आल्या.

### आमचे माजी विद्यार्थी :

( १ ) **श्री. शरश्चंद्र गंगाधर काळे :** श्री. काळे हे १९६२ एप्रिल–मे मध्यें झालेल्या पुणें विद्यापीठाच्या एम. ए. परीक्षेंत गणित विषय घेऊन पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण झाले. त्यांना गणित विषयांत सर्वांत जास्त गुण मिळाल्यामुळें ' दी इंडियन मॅथेमॅटिकल कॉन्फरन्स पूना, गोल्डन ज्युबिली प्राईझ रु. १००' हें पारितोषिक देण्यांत आलें. श्री. काळे यांनीं एस. एस्. सी. पासून एम्. ए. पर्यंत सर्वच परीक्षांत पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण होऊन अतुलनीय असें यश प्राप्त करून घेतलें. नू. म. वि. हायस्कूल मधून एस्. एस्. सी. झाल्यानंतर ते आपल्या महाविद्यालयांत दाखल झाले आणि १९६० मध्यें बी. ए. ची परीक्षा पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाच्या कीर्तींत विशेष भर घातली.

( २ ) **कु. मृणालिनी माधव साने :** कु. साने ह्या पुणें विद्यापीठाच्या १९६२ एप्रिल–मे मध्यें झालेल्या एम. ए. च्या परीक्षेंत संख्याशास्त्र हा विषय घेऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. तसेंच त्यांना संख्याशास्त्रांत सर्वांत जास्त गुण मिळविल्याबद्दल ' मॅथेमॅटिकल कॉन्फरन्स गोल्डन ज्युबिली प्राईझ् रु. १०० ' हें पारितोषिक देण्यांत आलें. कु. साने ह्यांचें सर्व शिक्षण आपल्या महाविद्यालयांत झालें. बी. ए. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन त्यांनी गुरुवर्य महर्षि कर्वे पारितोषिक मिळविलें होतें.

( ३ ) श्री. **सुरेश सदाशिव वाळिंबे :** पुणें विद्यापीठाच्या एप्रिल–मेमध्यें झालेल्या एम्. ए.च्या परीक्षेंत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन त्यांनीं ' रामराव नीलकंठराव यादीं वेदान्त पारितोषिक ' आणि ' विश्वनाथ पार्वति

गोखले संस्कृत पारितोषिक ' मिळविलें. श्री. वाळिंबे आपल्या महाविद्यालयांतून बी. ए.च्या परीक्षेला बसून प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले होते.

( ४ ) **श्री. वसंत कृष्णराव होनवाड :** श्री. होनवाड यांनीं यंदा पुणें विद्यापीठाच्या एम्. एस्‌सी परीक्षेत रसायनशास्त्र हा विषय घेऊन विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणींत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. त्यांचा पुणें विद्यापीठांत प्रथम क्रमांक आला. १९५५ ते १९५९ ह्या काळांत ते आपल्या महाविद्यालयांत शिक्षण घेत होते.

( ५ ) **प्रा. रा. ग. कुलकर्णी :** आपल्या महाद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. रामचंद्र गणेश कुलकर्णी ह्यांना पुणें विद्यापीठानें ' डेफिसिट फायनान्सिंग ' ह्या विषयावरील त्यांनीं लिहिलेल्या प्रबंधाबद्दल पीएच्. डी. पदवी दिली. १९४९ ते १९५२ ह्या काळांत ते आपल्या महाविद्यालयांत विद्यार्थी होते आणि १९५२ मध्यें अर्थशास्त्र हा विषय बी. ए. करितां घेऊन सन्माननीयरीत्या उत्तीर्ण झाले. तसेंच एम्. ए. परीक्षेतहि अर्थशास्त्र विषय घेऊन प्रथम क्रमांकाचें यश त्यांनीं मिळविलें होतें. त्या नंतर पोद्दार कॉमर्स कॉलेज, कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणें ह्या ठिकाणीं अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ह्या वर्षापासून वाई येथें निघालेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांची निवड करण्यांत आली आहे.

( ६ ) **श्री. एन्. एम्. जोशी :** श्री. जोशी हे आपल्या महाविद्यालयांतून बी. एस्‌सी परीक्षेला १९५८ सालीं बसले होते व त्या परीक्षेत पहिल्या श्रेणींत उत्तीर्ण झाले होते. त्यानंतर त्यांची इंडियन एअर फोर्समध्यें निवड झाली आणि सध्यां ते एअर फोर्स ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कॉलेजमध्यें शिक्षण घेत आहेत.

( ७ ) **श्री. कमलाकर सोपानराव धेंडे :** श्री. धेंडे हे आपल्या महाविद्यालयांतून बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले व सध्या एम्. ए. चा अभ्यास करीत आहेत. त्यांनीं आर्किटेक्टचा अभ्यास चालू ठेवला असून त्यांतील पहिली परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. त्यांनीं काढलेल्या चित्रांना अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य चित्रस्पर्धेत पारितोषिकें मिळालीं आहेत. तसेच त्यांनीं काढलेल्या मुखपृष्ठांचा स्वीकार अनेक मासिकांकडून झालेला आहे.

( ८ ) **श्री. रवींद्र भट :** आपल्या महाविद्यालयाचे एक माजी विद्यार्थी श्री. रवींद्र भट यांनीं आपल्या बंधूंच्या सहकार्यानें " चित्र–शारदा " या संस्थेची स्थापना केली. या संस्थेतर्फे ' तें माझें घर ' ह्या पहिल्या चित्रपटाचा मुहूर्त गेल्या १५ जून १९६२ रोजीं कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओमध्यें झाला. त्या समारंभाचें निमंत्रण प्राचार्य हुल्याळकर व इतर कांहीं प्राध्यापकांना आलें होतें. प्राचार्यांनीं श्री. भट यांना अभिनंदनपर तार पाठवून संस्थेचें शुभचिंतन केलें. श्री. भट हे स. प. महाविद्यालयाच्या ' कलामंडळा 'चे एक अष्टपैलू कलावंत होते. नाटकें, कवि-संमेलन वगैरे कलामंडळाच्या विविध कार्यक्रमांत ते नेहमींच भाग घेत असत. तसेंच ' परशुरामीय ' मध्यें सुद्धां त्यांच्या कविता व इतर लेख प्रसिद्ध झाले होते. आमच्या या होतकरू विद्यार्थ्यास त्यांनीं सुरू केलेल्या नवीन उपक्रमांत आम्हीं सुयश चिंतितों.

आमच्या या सर्व माजी विद्यार्थ्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना अंगीकृत कार्यांत उत्तम यश लाभो अशी शुभेच्छा आम्ही प्रगट करतों.

**अभिनंदनीय उपक्रम :**

गेल्या वर्षीं महाराष्ट्र राज्यसरकारकडून महाविद्यालयांतील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना वर्षाची फी मदत म्हणून मिळालेली होती. परंतु परीक्षेची फॉर्म–फी मिळालेली नव्हती. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीं स्वयंनिर्णयानें गेल्या वर्षींचें वार्षिक स्नेहसंमेलन स्थगित करून या विद्यार्थ्यांना त्या पैशांतून फॉर्म फी दिली. सुदैवानें नंतर महाराष्ट्र राज्यसरकारकडून विद्यार्थ्यांना फॉर्म-फी मिळाली. त्यावेळीं ह्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांनीं स्वतः अडचणींत असूनही सामाजिक जबाबदारी ओळखून पूर्वी मिळालेली फॉर्म-फी महाविद्यालयांतील कायम स्वरूपाच्या गरीब–विद्यार्थी–सहाय्यक–निधीला स्वयंस्फूर्तीनें दिली. ह्याबद्दल त्या विद्यार्थ्यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों.

**विद्यार्थी सहाय्यक समिति पुणें :**

विद्यार्थी सहाय्यक समिति पुणें, या संस्थेतर्फे स. प. महाविद्यालयांत लोकमान्य क्लब चालविण्यांत आलेला असून मासिक रु. २० इतक्या स्वस्त दरानें भोजनाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. अनेक गरजू विद्यार्थ्यांनीं ह्या उपक्रमाचा फायदा घेतलेला आहे. निरनिराळ्या शिक्षण संस्थांतील एकूण ११० विद्यार्थ्यांना ह्या सवलतीमुळें सहाय्य झालेलें आहे. त्यांची वर्गवारी अशी आहे. एस्. पी. कॉलेज ५१, शा. शि. विद्यालय १२, ग. पॉली टेक्निक ६, इंजि. डिग्री ४, वाडिया डिप्लोमा २, अभिनवकला ३, मुद्रण कला १, आयुर्वेद कॉलेज ३, एम. ई. एस्. कॉलेज ६, शेतकी कॉलेज १, शाहूमंदिर कॉलेज ८, हिंदी शिक्षक सनद १, पुणें विद्यापीठ ३, नाईट हायस्कूल २, बृ. म. कॉलेज ७.

अशा स्वस्त दरानें भोजनाची व्यवस्था करण्यामुळें अनेक गरीब विद्यार्थ्यांना फारच मोठी मदत झालेली आहे असें दिसून येतें.

### पुणें विद्यापीठानें स्थापन केलेला 'युनिव्हर्सिटी एम्प्लॉयमेंट ब्यूरो :

पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक पदवीधरांपुढें रोजगारीचा प्रश्न उभा राहतो. तसेंच कांहीं पदवीधरांना उच्च शिक्षणाबाबत उपलब्ध असलेल्या सोयी आणि संधि ह्याबाबतची निश्चित अशी माहिती आणि आवश्यक असलेले मार्गदर्शन मिळूं शकत नाहीं. ह्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीनें पुणें विद्यापीठानें ह्या ब्यूरोची ( मंडळाची ) स्थापना केलेली आहे. मंडळाच्या कार्याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी ह्या दृष्टीनें खालील मजकूर प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

### Functions of the Employment Bureau:

( 1 ) To select apprentices for practical training both technical and non-technical in firms and industrial concerns; ( 2 ) to recommend to the firms names of suitable candidates for appointment when requested; ( 3 ) to remain generally in touch with employers; ( 4 ) to collect statistics regarding possible openings and supplying information to graduates and undergraduates regarding the careers open to them; ( 5 ) to advice students preparing for various competitive examinations, to supply them with particulars of such examinations and if necessary to organise their training and to organise from time to time courses of lectures by competent persons; ( 6 ) to advise the Executive Council generally on all matters connected with employment.

### परशुरामीय ' निबंध स्पर्धा :

' परशुरामीय ' तर्फे पदवीपूर्व शास्त्र व पदवीपूर्व साहित्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठीं एक निबंध स्पर्धा ठेवण्यांत आली होती. ह्या स्पर्धेसाठीं ' महाविद्यालयीन जीवनांतील माझा पहिला दिवस ' हा विषय ठेवण्यांत आलेला होता. उत्कृष्ट ठरलेल्या निबंधांपैकीं पहिल्या दोन क्रमांकाच्या निबंधांना अनुक्रमें रु. १५ व रु. १० अशीं रोख पारितोषिकें ठेवण्यांत आलेलीं होतीं. ह्या निबंध स्पर्धेसाठीं फक्त पांचच निबंध विद्यार्थ्यांकडून आले होते. ह्यापेक्षां जास्त संख्येनें विद्यार्थी भाग घेतील अशी अपेक्षा होती, ती पूर्ण होऊं शकली नाहीं. ह्या पांच निबंधांपैकीं श्री. रवींद्र घवी यांचा निबंध सर्वोत्कृष्ट ठरल्यामुळें त्यांना पहिलें पारितोषिक देण्यांत आलें असून दुसरें पारितोषिक श्री. सुरेश दत्तात्रय देव यांनीं मिळविलेलें आहे. आम्ही ह्या दोन्हीही विद्यार्थ्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. हे दोन्ही निबंध ह्या अंकांत इतरत्र प्रसिद्ध करण्यांत आलेले आहेत.

### आभार प्रदर्शन :

' परशुरामीय'चा चालू वर्षाचा पहिला अंक विद्यार्थ्यांचे हातीं देतांना आम्हांस विशेष आनंद होत आहे. अंकासाठीं विद्यार्थ्यांनीं पाठविलेलें साहित्य वरच्या दर्जाचें होतें तरीसुद्धां अंकाचा आकार लक्षांत घेतां आणि चार भाषांतील साहित्य द्यावयाचे असल्यानें पडणाऱ्या मर्यादा पाहतां, आम्ही चांगल्या साहित्यापैकींसुद्धां फक्त कांहीं लेख आणि कविता प्रसिद्ध करूं शकलों. शिल्लक राहिलेल्या लिखाणांपैकीं कांहीं निवडक लेख आणि कविता शक्य झाल्यास ह्या वर्षाच्या दुसऱ्या अंकांत द्यावे असा विचार आहे. हा अंक तयार करण्याचें कामीं जे विद्यार्थी –लेखक, संपादक समितीचे सभासद इत्यादिकांनीं मदत केली त्यांचे आम्ही आभारी आहों तसेंच डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, प्रा. केणी, प्रा. भीमराव कुळकर्णी, प्रा. बी. एन. कुलकर्णी, प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर, सौ. अनुराधा पोतदार, इत्यादिकांनीं लेखांबाबत सूचना केल्या आणि सुधारणा सूचविल्या व मुद्रितें तपासण्याच्या कामीं मदत केली ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी

( दि. १-८-१९६२ )

## प्राचार्य हुल्याळकर यांचें भाषण

माननीय श्री. स. गो. बर्वे, उपस्थित सज्जन, प्राध्यापक आणि विद्यार्थि मित्रहो,

आज लो. टिळक पुण्यतिथीच्या शुभदिनीं आपल्या वादसभेचें उद्‌घाटन करण्यासाठीं महाराष्ट्राचे अर्थमंत्री मान. श्री. बर्वे. आपल्याला लाभले आहेत हा मोठा भाग्य-योग आहे असें मी समजतों. आज जवळ जवळ चाळीस वर्षे, आम्ही या दिवशीं टिळकांचें पुण्यस्मरण करीत आहोंत. या काळांत आमच्या विद्यार्थ्यांना टिळक-जीवनाचें रहस्य उलगडून सांगण्यास ने. ना. डॉ. बाबासाहेब जयकर, न्या. मू. गजेन्द्रगडकर, स्वा. वीर सावरकर, न्या. नाईक, धनंजयराव गाडगीळ, कुलगुरू द. गो. कर्वे, बाबासाहेब खापर्डे यांच्यासारखे थोर पुरुष आमच्या महाविद्यालयांत येऊन गेले आहेत. या विख्यात पुरुषांची थोर परंपरा पुढें चालविण्यासाठीं बद्धपरिकर झालेले महाराष्ट्राचे अर्थमंत्री, आज येथें आले आहेत. तेव्हां मी प्रथम आपल्या महाविद्यालयातर्फें श्री. बर्वे यांचें हार्दिक स्वागत करतों. पूर्वी एकदोनदां श्री. बर्वे आपल्या महाविद्यालयांत आले होते. त्यावेळीं ते सरकारी नोकर होते. आज ते स्वतः सरकार झाले आहेत. पण सरकारी सेवेंत असतांना त्यांनीं पुण्य-नगरीची जी निरलस सेवा केली, तिच्याच पुण्याईवर आज ते सत्तारूढ झाले आहेत. पुण्यावर आपत्ति आली असतांना, पुण्याच्या जनतेला प्रथम बर्वे यांचीच आठवण झाली. आणि मा. मुख्यमंत्र्यांच्याहि मनांत प्रथम त्यांचेंच नांव आलें. यावरून ' पुणें आणि बर्वे ' हीं नांवें अवि-भाज्य आहेत हें कोणाच्याहि ध्यानांत येईल.

माणूस मनांत संकल्प करीत असतो. योजना आखीत असतो. पण त्याप्रमाणें जमून आलें असें क्वचित्‌च घडतें. पण मा. बर्वे यांच्या बाबतींत तसें घडून आलें हें सुदैव होय. राजकारणांत पडावयाचें हें ठरवून त्यांनीं सनदी नोकरीचा राजिनामा दिला. त्यानंतर पुण्याच्या विरोधी पक्षाच्या बालेकिल्ल्यांतून ते निवडणुकीस उभे राहिले व भरघोस मताधिक्यानें निवडून आले, आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्रीहि झाले. मानवी संकल्प इतक्या आखीव पद्धतीनें कधींच सिद्धीस जात नाहीं. तो येथें गेला म्हणून मी श्री. बर्वे यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. श्री. बर्वे अर्थमंत्री झाले, यांत महा-राष्ट्राचें विशेष भाग्य आहे. तें हें कीं, आपल्याला एक अर्थशास्त्रज्ञ, अर्थमंत्री म्हणून मिळाले आहेत. एक अर्थ-पंडित, अर्थमंत्री झाले, याला फारच मोठा अर्थ आहे हें कोणाच्याहि ध्यानीं येईल.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री हे आमच्या पुण्याचे प्रतिनिधि आहेत, याचा आम्हांला विशेष अभिमान वाटतो. आणि आपल्या मतदार संघाचा त्यांनाहि असाच अभिमान वाटतो हें निवडून आल्यानंतर त्यांनीं जीं भाषणें केलीं त्यावरून दिसून येतें. आज त्याच दृष्टीनें कांहीं जिव्हा-ळ्याच्या गोष्टींचें त्यांच्यापुढें निवेदन करावें असें मनांत योजिलें आहे.

आमचें महाविद्यालय ही पुण्यांतल्या जुन्या शिक्षण-संस्थांपैकीं एक फार श्रेष्ठ व नामांकित संस्था आहे याबद्दल दुमत होईल असें वाटत नाहीं. फर्ग्युसन कॉलेज, सर परशुरामभाऊ कॉलेज, न्यू इंग्लिश स्कूल, नू. म. वि. प्रशाळा या संस्थांचे आदर्श पाहूनच महाराष्ट्रांत सर्वत्र अनंत संस्था उदयास आल्या. आणि आजहि त्या संस्था आमच्या या संस्थांकडे आदर्श म्हणूनच पाहतात. पण खरें मनांतलें सांगावयाचें म्हणजे, ज्ञानाची ही आदर्श चित्‌कला, अव्यय तेजानें अशीच टिकवून धरणें दिवसें-दिवस कठिण होत चाललें आहे. विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर यांच्यासारख्या थोरपुरुषांनीं विद्येचा जो रोपा येथें पाऊणशें वर्षांपूर्वीं लावला त्याचे शाखापल्लव आज सर्वत्र दिसत आहेत. कोल्हापूरचें श्रीशिवाजी विद्यापीठ हें त्याचेंच एक पक्क फल होय. पण शाखा पानें, फुलें, फळें अशीं सर्वत्र बहरत असतांना मूळ वृक्षाचें काय होणार आहे याविषयींच आम्हांला चिंता वाटूं लागली आहे. कारण या वृक्षाचें मूळ सिंचनच सध्यां नीट होईनासें झालें आहे.

आमच्या विद्यालयाचा प्रपंच केवढा आहे याची आपल्याला थोडक्यांत कल्पना देतों. आज आमच्या पटावर २७०० विद्यार्थी आहेत. त्यांत नऊशें विद्यार्थिनी आहेत. यांतील बहुसंख्य विद्यार्थी कनिष्ठ मध्यम वर्गांतून आलेले असतात. रु. १२०० च्या आंत उत्पन्न म्हणून सरकारी साह्य मिळालेले विद्यार्थी आमच्याकडे गेल्या वर्षी



शैक्षणिक वर्षारंभदिनीं भाषण करतांना ...
... माजी प्राचार्य शं. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर



शैक्षणिक वर्षारंभादिनीं प्रास्ताविक भाषण देतांना प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर

—: वादविवाद सभेच्या उद्घाटनप्रसंगीं :—



| (कार्यवाह) | प्राचार्य | अर्थमंत्री | उपप्राचार्य | (कार्याध्यक्ष) | उपप्राचार्य |
|---|---|---|---|---|---|
| श्री. भावे | हुल्याळकर | स. गो. बर्वे | प्रा. परांजपे | प्रा. सौ. कुमुद पोरे | प्रा. मालेगांवकर |



लो. टिळक पुण्यतिथीचे वेळीं महाराष्ट्र राज्याचे
अर्थमंत्री श्री. स. गो. बर्वे यांचें भाषण चालूं असतांना

४६६ होते आणि सरकारी शिष्यवृत्त्या मिळालेले ९३ विद्यार्थी होते. इतर विद्यार्थी रु. १२०० च्या आंत नाहींत इतकेंच. एवढ्या विद्यार्थ्यांसाठीं प्रयोगशाळा, ग्रंथालय, संग्रहालय, व्यायामशाळा, क्रीडांगणें, उपकरणें हें सर्व अद्यावत् स्थितींत टिकविणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. याशिवाय अनेक विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकें घेतां येत नाहींत, अनेकांना परीक्षेची फी देतां येत नाहीं तिची सोय करणें हीहि आमचीच जबाबदारी आहे. इतकेंच नव्हे तर अगदीं गरीब असलेल्या विद्यार्थ्यांचा योगक्षेम चालविणें हाहि आमच्या कर्तव्याचाच एक भाग आहे. विद्यार्थी साहाय्यक समितीसारख्या संस्था चालवून आम्ही यावत् शक्य तें पार पाडीत आहों. पण हें सर्व करीत असतांना आम्हांला मनोमन जाणीव आहे कीं, जें साधावयाचें आहे, त्या मानानें, जें साधलें आहे तें कांहींच नाहीं. शतांशहि नाहीं ! आणि याचें मुख्य कारण म्हणजे, सर्वारंभाचें प्रस्थमूल जें तंडुल, त्यांचा अभाव हें होय.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या पंधरा वर्षांत भारताची सर्व जगांत कीर्ति झाली आहे. आणि जगांतल्या थोर राष्ट्रांच्या श्रेणीमध्यें अग्रभागीं जाऊन बसण्याचा मान भारताला मिळाला आहे. आतां तो मान व ती प्रतिष्ठा टिकवून धरण्याची जबाबदारी आम्हा शिक्षकांची आहे अशी आमची श्रद्धा आहे. पण अमेरिका, ब्रिटन, जर्मनी येथें जाऊन तेथली विद्यापीठें व विद्यार्थी यांना जवळून पाहून आलेल्या प्रत्येक मनुष्याचें मन ही जबाबदारी आपल्याला कितपत पार पाडतां येईल याविषयीं साशंक होतें. कारण आज कोणच्याच दृष्टीनें तेथलीं व येथलीं विद्यापीठें व विद्यार्थीवर्ग यांची तुलना करणें शक्य नाहीं. मूळ बुद्धिमत्तेतच आमचे विद्यार्थी कमी आहेत असें मुळींच नाहीं. आणि आमच्यासारख्या जुन्या संस्थांना जे विद्यार्थी लाभतात त्यांच्याबद्दल तर असें कधींच म्हणतां येणार नाहीं. या वर्षींच्याच परीक्षांचे आमचे निकाल पहा. विद्यापीठाची पहिली परीक्षा पी. डी., तेथपासून एम्. ए. पर्यंतच्या बहुतेक सर्व परीक्षेंत आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी यंदा पहिले आले आहेत. पी. डी. परीक्षेंत श्री. सं. वा. फोल्हटकर पहिले आले. श्री. दि. वा. करंदीकर हे पी. डी. परीक्षेंत भौतिकी विषयांत पहिले आले. श्री. वि. रा. सरनाईक प्री–प्रोफेशनल परीक्षेंत गणितांत पहिले आले. श्री. रवीन्द्र कुलकर्णी बी. ए. च्या परीक्षेंत पहिले आले, एम्. ए. च्या परीक्षेंत श्री. सुरेश वाळिंबे हे संस्कृतमध्यें, सौ. मृणालिनी दातार या स्टॅटिस्टिक्समध्यें पहिल्या आल्या आणि श्री. शरद काळे हे गणित घेऊन सर्व विद्यापीठांत एम्. ए. च्या परीक्षेंत पहिले आले. श्री. काळे हे मॅट्रिकला पहिले, इंटरला पहिले, बी. ए. ला पहिले व आतां एम्. ए. लाहि पहिले आले आहेत. श्री. रवीन्द्र कुलकर्णी हे मॅट्रिकला, इंटरला व आतां बी. ए. ला पहिले आले आहेत. त्यांना हार्वर्ड विद्यापीठाची शिष्यवृत्ति मिळाली असून ते आतां पुढील अभ्यासासाठीं लवकरच अमेरिकेला जातील. आमच्या महाविद्यालयांतील आणखीहि ५–६ विद्यार्थी या वर्षीं शिक्षणासाठीं परदेशीं जात आहेत. त्यांचा व विद्यापीठांतील परीक्षांना जे पहिले आले त्यांचा आपल्याच हस्तें आज सत्कार करण्याचा विचार आहे.



विद्यार्थ्यांचें हें सुयश पाहून मन आनंदानें कोंदून जातें हें खरें. पण असल्या दर्जाच्या विद्यार्थ्यांच्या सुप्त *गुणांचा पूर्ण विकास करण्यासाठीं आम्हांला अवश्य ते* प्रयत्न करतां येत नाहींत हा विचार येऊन मन जरा खिन्न होतें. बुद्धिमत्ता आहे पण साधनसंभार कमी, उपकरणें तोकडीं, यामुळें इतर देशांतल्या विद्यार्थ्यांची उंची आमच्या विद्यार्थ्यांना गांठतां येऊं नये हा विचार मनाला संत्रस्त करतो. स्वातंत्र्यापूर्वींचें ठीक होतें. पण आतां स्वातंत्र्यानंतरहि हेंच घडावें ही कल्पना अगदीं असह्य आहे.

आज महाविद्यालयाच्या प्रत्येक अंगाचा व्याप वाढत आहे, तसतसा खर्चहि वाढत आहे. आणि अर्थप्राप्तीचीं साधनें वाढत तर नाहींतच. उलट कमी होत आहेत. प्राध्यापकांच्या वेतन श्रेणी वाढविल्या. त्याचा खर्च दरसाल १०।१५ हजारांनीं वाढत चालला आहे. इतकेंहि करून प्राध्यापकांचा आजचा पगार त्यांना प्रतिष्ठेनें व मानानें राहाण्यास अपुराच आहे; पण यांत भर म्हणून आतां पुढील वर्षापासून आणखी एक आपत्ति येणार आहे. विद्यापीठ अनुदान मंडळ प्राध्यापकांच्या पगारांतील वाढीसाठीं आतांपर्यंत जी ५० टक्क्याइतकी रक्कम देत असे ती आतां बंद होणार आहे. म्हणजे ही २५–३० हजारांची आणखी खोट आली. सध्यां महाविद्यालयाचा प्रपंच विद्यार्थ्यांची फी व सरकारी अनुदानें एवढ्यावरच चालतो. यांतलीं अनुदानें बंद होणार आणि फीवाढ करणें शक्य नाहीं; कारण आतांच फीवाढीनें कमाल मर्यादा गांठली आहे. धोक्याच्या पातळीजवळ ती आली आहे. म्हणजे फी वाढवितां येणार नाहीं, पगार कमी करतां येणार नाहींत व अनुदानें मिळणार नाहींत. अशा कोंडींत आम्हीच नव्हे तर पुण्यांतील जुन्या सर्व शिक्षणसंस्था सांपडल्या आहेत.

हें आमच्या एका महाविद्यालयाचें गाऱ्हाणें म्हणून मी आपल्यापुढें मांडीत नाहीं तर महाराष्ट्राच्या अर्थ मंत्र्यापुढें मी महाराष्ट्राच्या लोकशाहीचें गाऱ्हाणें मांडीत आहे. नवी पिढी कर्तृत्वसंपन्न, प्रज्ञावंत व तेजस्वी करावयाची असेल तर, या विद्यार्थ्यांतून पहिल्या श्रेणीचे नेते, विचारवेत्ते, तत्त्ववेत्ते, संशोधक, निर्माण व्हावयाचे असतील, तर शिक्षणाचा दर्जा रतिभरानेंहि हीनावता कामा नये, असें आमचें निश्चित मत आहे आणि ही जबाबदारी जितकी आमची तितकीच सरकारची पण आहे, असें मला वाटतें. म्हणून, अर्थमंत्र्यांना माझी नम्र विनंति अशी कीं, या समस्येचा आमूलाग्र नव्या दृष्टिकोनांतून विचार सरकारनें करावा. आज तसा होत नाहीं. ही आपली जबाबदारी आहे अशा दृष्टीनें शिक्षणसंस्थांकडे पाहिलें जात नाहीं. कांहीं वार्षिक अनुदान दिलें कीं संपलें अशी वृत्ति सध्यां आहे. आणि तेंहि निश्चित मिळेलच अशी शाश्वती धरतां येत नाहीं. मी हें सांगितलें तें विशेषत: उच्च व महाविद्यालयीन शिक्षणाविषयीं सांगितलें. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारनें सर्वथा आपल्या शिरावर घेतली आहे आणि त्यासाठीं सरकारला द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत. लोकशाहीचा पायाच त्यानें भरला जाणार आहे. आमच्या शिक्षण प्रसारक मंडळीची स्थापना प्राथमिक शिक्षणाच्या अभिमानानेंच झाली आहे. तेव्हां आम्ही त्याविषयीं दुजाभाव ठेवणें शक्यच नाहीं. त्याचप्रमाणें दुय्यम शिक्षणासाठीं सरकार फार आटापिटा करीत आहे हेंहि खरें; माझी विनंति एवढीच कीं उच्च शिक्षणालाहि सरकारी कृपेचा असाच थोडा अंश लाभला तरी आमचा भार बराचसा हलका होईल. आणि आजची निकडीची गरज ती आहे. सर्व देशाचा कारभार पाहणारे तरुण उद्यांला हवे आहेत. आजच हवे आहेत. ते या सारख्या महाविद्यालयांतूनच येणार. म्हणून ही विनंती करीत आहें. पुढील २५।३० वर्षांचा काळ हा विकास–योजनांचा काळ आहे. आणि सर्व नेते एकमुखानें सांगत आहेत कीं, 'या योजनांसाठीं कर्तबगार माणसेंच मिळत नाहींत.' पण उच्च शिक्षणाचा दर्जाच खालावला तर माणसें मिळणार कोठून? हा दर्जा ढासळूं देणार नाहीं अशी आम्ही प्रतिज्ञा करून बसलों आहोंत. आम्ही, आमचे प्राध्यापक व आमचे विद्यार्थी वाटेल ते कष्ट सोसूं, विपत्ति साहूं, पण विद्येच्या उपासनेचें पुण्याचें जें व्रत आहे त्याची सांडणी करणार नाहीं. पण आजच्या काळांत क्रियासिद्धीला केवळ हें सत्त्व पुरें पडत नाहीं. साधनसंभारावर आणि उपकरणावरहि यशापयश तितकेंच अवलंबून आहे. अभ्यास करावयाचा म्हणजे ग्रंथ पाहिजेत, रसायनें पाहिजेत, अनेकविध द्रव्यें पाहिजेत, आणि हीं सर्व उपकरणें मागल्यापेक्षां दसपटीनें पाहिजेत. हा सर्व साधनसंभार कसा उभा करावा या विवंचनेंत आम्ही आहों. माझी श्री. बर्वे यांना विनंती अशी कीं, ही विवंचना आपलीच विवंचना आहे असें मानून आम्हांला त्यांनीं विवेक सांगावा, मार्ग दाखवावा.

अर्थमंत्री झाल्यापासून श्री. बर्वे यांच्या मागचा व्याप अनेक पटींनीं वाढला असणार यांत शंकाच नाहीं. नुकतेच ते दिल्लीला जाऊन महाराष्ट्राच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची अर्थव्यवस्था भक्कम करून आले. सध्यां महाराष्ट्राच्या विधानसभेचें पावसाळी अधिवेशनहि चालू आहे. या सर्व व्यापांतून आमच्यासाठीं त्यांनीं वेळ काढला व ते येथें आले त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. एवढें सांगून मी आपलें भाषण पुरें करतों व सभेचीं सूत्रें हातीं घ्यावीं अशी मा. बर्वे यांना विनंती करतों.

☆

[ लोकमान्य टिळक पुण्यतिथि दि. १-८-१९६२ रोजीं प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर यांनीं केलेलें भाषण ]

## शब्द आणि भावना

शब्दासाठीं नाहीं आपण
भावासाठीं शब्द खरे !
मंत्रतंत्र तें सारें खोटें,
भाव एकला जगीं उरे !!

शब्दांचें हें शरीर खोटें,
भावात्म्याला मान खरा !
जीवनांतला तोच सुखाचा,
सदैव सुंदर असे झरा !!

केवळ गुंफण दो शब्दांची,
भावशून्यता जिथें वसे !
प्रेमावांचुन दो जीवांचें,
मीलन मजला भासतसें !!

——वा. मा. शाळिग्राम
( प्रथम वर्ष, साहित्य )

# विविध मंडळांचे अहवाल

## नियोजन-चर्चा-मंडळ

चालू शैक्षणिक वर्षाच्या नियोजन–चर्चा–मंडळ कार्याचें उद्‌घाटन दिनांक ६–७–१९६२ रोजीं पंजाबचे राज्यपाल श्री. काकासाहेब गाडगीळ यांचे शुभ हस्तें झालें. अध्यक्षस्थानीं प्रा. हुल्याळकर होते. नामदार काकासाहेबांनीं आपल्या भाषणांत आर्थिक विकास व नियोजन याविषयीं मौलिक विचार प्रकट केले. सामान्य जनांच्या दैनंदिन जीवनास आवश्यक असणाऱ्या वस्तूंची *निर्मिति समाजाच्या नियंत्रणाखालीं असावी आणि* उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करावें असें स्पष्ट मत त्यांनीं व्यक्त केलें. तसेंच भारतांतील आर्थिक स्थिति, जगांतील विचार प्रवाह या सर्वांचा साकल्यानें विचार करूं शकणारा द्रष्टा नियोजक ही आपल्या देशाची आजची गरज आहे असें ते म्हणाले.

दिनांक २३–८–१९६२ रोजीं नियोजन–चर्चा–मंडळाच्या वतीनें श्री. श्री. गो. पेंडसे द्वितीय वर्ष पदवी यांना निरोप देण्यांत आला. ते उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेला जाणार आहेत. या समारंभाच्या अध्यक्षस्थानीं प्राचार्य हुल्याळकर होते. डॉ. केरूर यांनीं प्रास्ताविक भाषण केल्यानंतर अध्यक्षांचे हस्तें श्री. पेंडसे यांना श्रीफळ आणि गुच्छ देण्यांत आला. अध्यक्षीय भाषणांत प्राचार्यांनीं श्री. पेंडसे यांना आशीर्वाद देऊन त्यांनीं उच्च शिक्षणाचा उपयोग राष्ट्रकार्यार्थ करावा अशी इच्छा व्यक्त केली. तसेंच ता. १८ सप्टेंबर १९६२ रोजीं रिझर्व बँकेचे श्री. एस्. एम्. चिटणीस यांचें 'Provisions of Banking Companies Act 1949 with special reference to the provisions relating to amalgamation' ह्या विषयावर व्याख्यान झालें.अध्यक्षस्थानीं प्रा. आर्. एम्. गोखले होते.

गतवर्षीप्रमाणें या वर्षींहि विद्यार्थ्यांचे निबंध, परिसंवाद, चर्चा आणि बाहेरील तज्ज्ञांचीं व्याख्यानें आयोजित करण्यांत येतील, ( या सर्व कार्यक्रमामध्यें विद्यार्थ्यांचा वाटा अधिक राहील हें आम्ही कटाक्षानें पाहूं ).

नियोजन–चर्चा–मंडळाचें एकंदर कार्य, विद्यार्थ्यांना नियोजनाविषयीं विवेचक दृष्टि यावी आणि गेलीं दोन दशकें देशांत चालू असलेल्या विकास कार्यांत यथाशक्ति सहभागी होण्याची त्यांना प्रेरणा मिळावी हें आहे. या कामांत विद्यार्थि–सदस्य आणि प्राध्यापक वर्ग सहकार्य देतील अशी खात्री आहे.

| कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|
| **डॉ. दि. ब. केरूर** | **जी. बी. मोरे,** तृ. व. पदवी |
| | **सुधा वाडदेकर,** ,, |
| | **आर. एम्. जाधव** द्वि. व. पदवी |
| | **सुरेखा पानवलकर** ,, |

## वादविवाद मंडळ व लो. टिळक स्मारक ग्रंथालय

### अहवाल : पहिली सहामाही–१९६२-६३

वादसभेच्या कार्याचा प्रारंभ दिनांक १ ऑगस्ट, १९६२ रोजीं झाला. या प्रसंगीं लो. टिळक पुण्यतिथी-निमित्त महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री श्री. स. गो. बर्वे यांचे "विकास योजनेची वाटचाल" या विषयावर भाषण झालें.

गतवर्षीप्रमाणें या वर्षींहि विद्यार्थ्यांसाठीं एक निबंध स्पर्धा जाहीर करण्यांत आली आहे. निबंध–स्पर्धेतील प्रत्येक विषयावर आपल्या महाविद्यालयांतील प्राध्यापकांचीं भाषणें ठेवण्यांत आलीं होतीं. प्राध्यापकांचें मार्गदर्शनपर भाषण झाल्यानंतर त्याच विषयावर विद्यार्थ्यांची सभा घेण्यांत आली. या सभांचें स्वरूप खालीलप्रमाणें आहे.

( १ ) प्रा. पां. श्री. घारे " पंचायत राज्य व लोकशाही विकेंद्रीकरण. "

( २ ) श्री. पळसुले, श्री. उत्तेकर–मुख्य वक्ते.
विषय–" पंचायत राज्य व लोकशाही विकेंद्रीकरण "
अध्यक्ष–श्री. आनंद य. भावे, तृतीय वर्ष बी. ए.

( ३ ) डॉ. श्री. र. कावळे–मुख्य वक्ते.
विषय–" बदलती समाजव्यवस्था व नैतिक मूल्यें "

सालाबादप्रमाणें लो. टिळक स्मृति ग्रंथालयासाठीं रु. २०० नवीं पुस्तकें घेण्यासाठीं राखून ठेवले आहेत.

कै. रानडे वक्तृत्व स्पर्धा, बेळगांव येथील गोगटे ढाल स्पर्धा, मुंबई येथील कथा–कथन स्पर्धा यांसाठीं विद्यार्थी पाठविण्यांत आले.

यंदाचे वर्षीं झालेल्या न्यायमूर्ति रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धेमध्यें आपल्या महाविद्यालयातर्फे श्री. कोंडेजकर व कु. शैलजा भाटे यांना पाठविण्यांत आलें

होतें. त्यांनीं अनुक्रमें दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकांचें वैयक्तिक पारितोषिक मिळविलें व आपल्या महाविद्यालयाला प्रथम क्रमांकाचें विजेतेपद मिळवून दिलें. आम्ही विजयी विद्यार्थ्यांचें हार्दिक अभिनंदन करतों.

पहिल्या सहामाहीत विद्यार्थी-वर्ग आणि प्राध्यापक यांच्या सहकार्यानेंच आम्हीं कार्य करूं शकलों, त्याबद्दल त्यांचे आभार.

**आनंद य. भावे**
कार्यवाह

## प्राध्यापक वादसभा ( वर्ष तिसरें )

यंदा वादसभेचा आरंभ डॉ. कावळे यांच्या 'Impressions of my study-tour o, the U.S.A.' या विषयावरील व्याख्यानानें दि. ६ जुलै १९६२ रोजीं झाला. डॉ. कावळे हे अमेरिकेंतील कोलगेट विद्यापीठांत राहून, यशस्वी होऊन यंदा परत आले. त्यांनीं आपल्या व्याख्यानांत अमेरिकेंतील प्रवास, तसेंच कोलगेट विद्यापीठातील अभ्यासक्रम, शिक्षणपद्धति यासंबंधींची माहिती सांगितली. सुविख्यात शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्यूई यांचे शिक्षणविषयक विचार हा डॉ. कावळे यांच्या संशोधनाचा विषय होता. तिकडील महाविद्यालयीन शैक्षणिक जीवन व General Education Programme यांचें त्यांनीं जें निरीक्षण केलें त्या बाबतींत आलेले अनुभवहि त्यांनीं सांगितले. अमेरिकेच्या शिक्षण पद्धतींत विविधता, लवचिकता इत्यादि गुण असून तेथील शिक्षणसंस्था अत्युत्तम शिक्षण देण्याची कशी पराकाष्ठा करतात याचें त्यांनीं सोदाहरण विवेचन केलें. अमेरिकेंतील समाज, शिक्षण कार्यास कशी सढळ हातानें मदत करतो हें सांगून विद्यापीठांची रचना, विविध खातीं, संशोधनास मिळणारें उत्तेजन व साह्य,शैक्षणिक स्वातंत्र्य, शिक्षणाच्या विविध पद्धति, परीक्षा पद्धति ,विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रांतील हालचाली, महाविद्यालयांच्या विकासाच्या विविध योजना यांची माहितीहि त्यांनीं दिली. शेवटीं अमेरिकेंतील लोकांचा भारताच्या संबंधींचा दृष्टिकोन सांगतांना ते म्हणाले कीं, 'भारतापुढील कठीण समस्येची त्यांना जाणीव आहे व भारतीय जनतेबद्दल त्यांना सहानुभूति वाटते.' व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरें होऊन हा कार्यक्रम संपला.

Academic freedom enjoyed by teachers is to my mind one of the principal reasons why one finds in the U. S. colleges a sufficiently high level of professional competence in teachers. Freedom to plan and organise courses enables a teacher to work more in the area of his special interests. Production of high quality research naturally results from the facalities given, reduction in the teaching-load, and delightful and creative teaching experience in the small class room where students not only participate but also challenge the teacher by raising critical questions. There exists a more meaningful structure and function of teacher-student relationship. The phrase " quest for excellence through clarity of understanding " aptly voices the spirit of educational activity that goes on in these colleges.

Problems of a private independent college in the U. S. are, surprisingly enough, closely similar to what we have been facing in India. I found that there is an unusual degree of co-ordination between past-students, teaching staff, college administrators and the managing council in understanding educational problems and making decisions in the best interests of the institution. Raising more and more funds to meet rising costs of running a college, attracting scholarly and able teachers to the undergraduate teaching, improving the educational facilities of all kinds, and giving to students not only excellent instructions but also enriching experience of social living- these are some of the problems U. S. colleges are confronted with. Gorgeous campuses, altra modern equipment of the physical plant and concern for growth and quality at all these places gave me a feeling of vitality and enthusiasm.

It would be hypocritical on my part if I give the impresssion that I have found in the U. S. a Utopion system of education. I have naturally come across social complexities and problems that bother and confront educationists in the U. S. But what is more important to note is that the people concerned are themselves deeply aware of their problems. It is easy to say that they have not solved all of their problems. No active living society would make a fantastic claim that they have no problems. But we must appreciate that the U. S. society has made a tremendous advance in science and technology, economic and social engineering by constant struggle and exploration in the complex field of ends and means for the betterment of people. Let us learn to admire the ' Attitude of eternal vigilence ' shown by the leading countries of the world like U. S. and the U. S. S. R.

I participated in the various community and University events like concerts, pannel discussions, seminars, career conferences, convocations, party week-ends, parents week-end and

the like. This gave me a few glimpses of the American community life. Through my associations with variety of people the concept of Christianity became more meaningful to me. I could comprehend in concrete terms basic concerns of the Christian faith. The Meditation Centre of the Colgate University deepened my spiritual convictions and rendered me an unfailing protection and strength in moments of confusion.

Thus, I have come back to my almamater with a freshness of perspective, renewed vigour and broad concerns for values of higher education, international understanding and world-peace.

This is not all what I want to convey to you. But these certainly are the impressions and ideas upper most in my mind when I recall the delightful. and enriching experiences of the U. S. institutions.

* * *

# Sea Wealth

Miss **Kalindi Kelkar**, Sy. Bsc.

Water occupies three forths of the surface of the earth. Its area would be 13 crores square miles. Depth of the sea is deifferent at different places but taking the avarage it can be said that the volume occupied by the seas and oceans is as vast as 30 crores cubic feet From time immemorial man has a curiosity to know what is hidden in the depths of seas. It was this curiosity, which led even Gods and Asuras to churn the ocean as narrated in Mahabharat. They were able to get fourteen precious jewels it is said. Who in 20th century would believe in this story ? But it is a fact that the sea is a rich store-house of many precious things so important to modern life The term " Ratnakar " applied to the sea which means a mine of jewels is as true to-day as it was in the days of old.

The wealth of the sea is of different kinds. It is in the form of dissolved substances present in its water and it is in the form of living arganisms—the vegetables and the animals.

Sea-water is mainly the solution of chlorides and sulphates. By far the most important substance present in sea-water is common-salt or sodium chloride as the chemists call it. The chief use of salt is an ingradient of food. Vegetarians and particularly rice eaters require more salt than those who eat wheat and meat. It is estimated that the former require about 7 kgs. of salt per head per year while the latter can do with 3 to4 kgs. The deficiency of salt or excess of it would result in painful ailments in the body.

In old China a culprit was given a diet without any salt in it and it was considered a dreadful punishment. Certainly it must be ! Salt is used as a preservative for fish and meat. We use it in pickles also which we prepare out of mangoes, lemons and chillies. Salt is equally impartant in many industries. It is used in the manufacture of glazed ceramics, in Metallurgy and in the manufacture of many impartant chemicals. Washing soda which is an article of every day use is prepared from common salt by the well-known Le. Blanc process. Before this process was invented industry had to depend on soda which occured naturally in some earths or on a similar chemical potassium carbonate obtainable from the ashes of certain plants. Naturally it was not abundant and cheap as it is to-day. The process has been superceded by a more efficient and cheaper process invented by E. Solvey.

Caustic soda and chlorine which are two other very important chemicals of commerce require common-salt as the raw material. When a current of electricity is passed through

a solution of common salt, it is decomposed in to sodium and chlorine. The sodium reacts further with water and gives caustic soda. Caustic soda is used in the manufacture of soap and textiles, medicines and dyes. Chlorine is required for the manufacture of bleaching powder, chloroform and in a number of other industries.

Salt is obtained from sea-water which is allowed to evapourate in ponds by solar heat. The salt thus obtained contains many other substances besides Sodium chloride. Salt is also obtained from mines. This was formed hundreds of years ago by the drying up of inland seas.

Sea-water contains on an avarage 35 parts of salts in every thousand parts of water. Prominent among the salts present are sodium chloride, Magnessium chloride, Magnessium sulphate. Calcium chloride, Potassium sulphate, Calcium carbonate and Magnesium Bromide. Common salt forms about 77% of the total salts.

When common salt is manufactured there remains behind a solution called " bitterns' which constitute a rich source of valuable chemicals. The bitterns produced in the salt–manufacture in India contains 2500 tons of Bromine, 45000 tons of Potassium Chloride, 9000 tons of Magnesium Sulphate and 15000 tons of Magnesium chloride. Bromine farms an important raw material in the production of photographic chemicals and in the petroleum industry, while Potassium salts are Valuable as fertilizers and Magnessium salts are important to the textile industry and for the production of metal magnessium so useful in the air-craft industry. These chemicals are recovered as by-products during salt manufacture.

There are many sea-plants which are also-useful. Some of the weeds growing in the sea or on the sea-shore have the ability to absorb iodine from the sea–water. This element is present in the plants in the form of its salts. When the weeds are burnt they remain in the ashes and the valuable element iodine can be isolated. Japan used to manufacture it from this source on a large scale. The household use of iodine is in the form of tincture iodine which we apply when we get a bruise or a cut. By its disinfecting action it saves us from any future trouble likely to develop by the attack of germs. Large amounts of iodine are required in photographic industry, in the dye-industry and in the manufacture of medicines.

Another sea-weed with novel properties is called Algin. From the constituents of this weed fibres can be produced and they are sufficiently strong to be woven into fibrics. However these fabrics are affected by soap and soda and such a fabric can not be washed. The fibres are however used in an ingenious process for weaving very thin woolen cloth. Extremely thin wool fibres are naturally too delicate to stand for weaving operation are re-enforced by combining them with Algin.fibres. After being woven the fabric is treated with a weak solution of soda and soap. Algin fibres dissolve out leaving behind an extremely fine and delicate woolen cloth. Algin has many other uses also.

Another important sea-weed gives us a substance called " Agar Agar ". Manufacture of Agar-a-gar is an important industry in Japan and China. Agar-agar has the property of forming a jelly with water. It is used on a large scale in bacteriology, in medicine and in food-products.

As the sea-water contains many inorganic nutrients and organic matters as well, it is populated by a variety of plant and animal organisms. The ocean reecives nearly 70% of the total solar energy received by the earth which is used by many tiny plants floating in the upper parts of the ocean to manufacture living substance. These minute plants which are collectively called "Plankton" are consumed by many different of animals which thrive species in them. Many fish large or small are dependent directly or indirectly on Plankton for their subsistance.

Fish is an important food for many. countries like Japan where fertile land is so

little has to depend on fish as main diet.

Since the development of methods for storage of fish, transportation of fish and fish-products to region distant from sea has become possible.

*Fish can be preserved by canning, salting,* smoking and drying. Producton of fish meal and other useful prodcts from waste material of fish has given rise to a large fish-industry.

Oils obtained from the livers of the fishes-like the cod, the shark, halibut and others are rich in vitamins A and D and are therefore used in medicine.

The waste products from the fisheries are converted into many useful products. Fish-glue, an important article of commerce is obtained from waste material of fisheries.

Besides the fish many other sea-animals such as oysters and clams shrims, crabs lobsters and turtles, terrapin are consumed as food in large quantities.

Pearls which we use for our necklaces are produced by a small sea-animal. The industry of cultured pearls was found by Mikymoto who after fifteen years of struggle was able to produce a wholly spherical pearl in about 1909.

Corals and tortoise shells are also obtained from certain animals living in the sea. One would not believe but the sponge is a skeleton of a sea-animal. These animals are abundant in Medeterranean and taking out sponges and processing them for commerce is an important industry. Besides these the whales give fat, the walrus another sea-animal gives many valuable skins and furs. Whaling had played a very important part in the economic history of many nations. Because whales furnished a large part of world with illuminating oil, candles and whale-bones with the discovery of petroleum the importance of deep sea-whaling has diminished but the discovery of hardening the oil obtained *from whales by hydrogenation has revived* interest in whale-products.

A very delicate perfumary product called Ambergriss is obtained from the sea. It is produced from some kinds of whales and is found in the form of limbs floating on the surface of the sea. It has a sweet smell *and is very useful in perfumary.*

All the above are instances of the material wealth we get from the sea. But the sea is full of unknown and mysterious facts which if explored would prove immense benefit to mankind. Man is therefore making more and more efforts to obtain this information. Before 20th century a very little was known about even simple things of the sea. Nobody knew definitely what was the depth of the sea at different places, whether any animals live at greater depths and what were their habits. It is now well known that if we have sufficient knowledge of the sea-currents, its temperature, its depths we would be able to derive great benefit and therefore man is now making equally great efforts to collect such valuable treasures in the form of knowledge of the sea.

India has sea on its three sides. But we are not explotiting the wealth of the sea as such as we should. The Indian ocean is one of the greatest oceans yet very little is known about it. In 1959 an International Body has decided to investigate the Indian ocean. More than 10 different nations are taking part in it and this plan would continue up to 1965. The information would be very useful in Navigation. It is expected to bring to light many new animals and plants growing in the sea. It would show whether there are any valuable minerals at the bottom of the occan and it would give many facts which would be useful in making weather forecast.

---

*References* (1) Marine Products of Commerce by Tressler and Leman, Reinhold Publication.

(2) *Products and Processes by Kelkar and* Varde, Macmillan Publication.

## Confidence

*" Harsh, harsh, life is too rash.*
*Oh, poor youth ! you shall surely crash. "*
*Thundered the grinning clouds,*
*Those jealous, gloomy shrouds.*
*A youth stood there,*
*Gazing at their sneer,*
*Still unjolted, he stood without fear,*
*Soon, he thought, the sky would be clear.*
*" Surely, a feeble, quite a feeble child,*
*How do you stand, abandoned in this wild ? "*
*The youth heard it but heeded not,*
*The array of great men cheerd him a lot.*
*" Vain, vain is your strut and play*
*Hark the deluge ! and our sway !*
*The youth raised his neck*
*Never doubting his confidence would break,*
*Much annoy'd the clouds frett'd*
*Roared, but no tremor was creat'd.*
*They rag'd and rumsl'd, they faded.*
*The yonth travell'd on—undaunted.*

**S. V. Kolhatkar**
F. Y. B.Sc.

---

## To The Swallow

**Mangala S. Keni**
( T. Y. B. A. )

*From the farthest land,*
*Over the wind-blown sand,*
*Tell me, oh, gay swallow,*
*On thy airy heights,*
*In thy flutter and flights,*
*Under the wide-stretching hollow,*
*Is it to thy homeward way,*
*Where, the sun's ever bright and gay,*
*And has long been in your wait lying,*
*That with no fear thou art soaring ?*
*But whence came this presentiment,*
*That away the winter has slipp'd,*
*And the leafy spring has creep'd,*
*Into thy dearest, happiest land ?*
*Hark ! thy very song speaks out*
*" I, myself, know it not...*
*...Still, on and on, to yonder place*
*Me the presentiment of spring allures.*
*So on my airy heights*
*In delightful flights*
*To my happy land*
*With spring—bedeck'd*
*In a home—sick cry*
*Do I ceaseless fly. "*

★ ★ ★

## मराठी विभाग

### परशुरामीय निबंधस्पर्धा–पारितोषिक क्र. १

# महाविद्यालयीन जीवनाचा पहिला दिवस

**रवीन्द्र घवी**, पदवीपूर्व साहित्य

' पहिल्या दिवसा 'चं काव्य मीं माझ्या जीवनांत पुष्कळ वेळां अनुभवलं आहे ! पहिला दिवस म्हणजे भावनांची उत्कटता ! बऱ्यावाईट रंगांनीं रंगलेल्या स्वप्नांचं सत्यसृष्टींत होणारं रूपांतर !! माझं आयुष्य म्हणजे वाकडा तिकडा घाट आहे ! प्रत्येक वळणावर मला स्वप्नं पडतात....घाटाचा पुढील भाग असा असेल ...असा नसेल. वेड्यासारखं मी स्वप्न रंगवतों. अनुभव अगदीं निराळा आणि विचित्र येतो ! परंतु दुसऱ्या वळणावर पोंचताच मी पुन्हा निराळं स्वप्न रंगवूं लागतों ! अज्ञाताबद्दल मला मोठं आकर्षण आहे. या आकर्षणामुळें माझ्या जीवनांत येणाऱ्या निरनिराळ्या " पहिल्या दिवसां "त उत्कट काव्य निर्माण झालं आहे ! तें सदैव टिकून आहे !

महाविद्यालयीन जीवनाबद्दल मीं असंच स्वप्न रंगविलं होतं ! आज मला कळून चुकलं आहे कीं, त्या स्वप्नाचे रंग खोटे होते. त्या कल्पना अज्ञानी होत्या....पोरकट होत्या....

मी जेव्हां प्राथमिक शाळेंत होतों, तेव्हां हायस्कूलच्या जीवनाचं आकर्षण मला होतं आणि हायस्कूलमध्यें असतांना कॉलेजचं आकर्षण मला वाटत होतं ! जणूं कांहीं माझ्या जीवनाच्या रुंदावणाऱ्या कक्षा एकेका आकर्षणाला छेद घालीत आहेत !

महाविद्यालयीन जीवनाचा पहिला दिवस ! आज माझ्या आकर्षणाची–उत्सुकतेची–परिसीमा होत आहे ! भावनांचा गल्बला सुरू झाला आहे माझ्या मनांत ! कसले तरी गूढ स्वर निनादत आहेत ! फडक्यांच्या कादंबऱ्यांत वाचलेलीं कॉलेजचीं वर्णनं माझ्या डोळ्यांपुढें तरळत आहेत ! आणि मला थोडं विचित्र वाटतं, कीं कॉलेजच्या झगमगाटी जीवनाचं मला असं आकर्षण कां वाटत आहे ? कॉलेजच्या भपकेबाज जीवनाचं चित्र चितारतांना माझ्या घराचं, माझ्या परिस्थितीचं वास्तव चित्र मला पुसतां येणार आहे का ? कॉलेजची फी भरतांना वडलांना पडलेला त्रास मी तावडतोब नष्ट करूं शकेन का ? मी माझ्या मनाची समजूत करतों. खांडेकरांचा एखादा नायक ( गरीब व ध्येयवादी ) माझ्यापुढें उभा करतो ! त्याच्या ध्येयवादांत मी गुरफटून जातों ! आगरकरांचं जीवन डोळ्यापुढें आणतों. एक शर्ट ! तोच धुवायचा, नगरपालिकेच्या दिव्याखालीं अभ्यास करावयाचा !...

स्वप्न आणि सत्य यांचा पाठशिवणीचा खेळ मी आज खेळतों आहें. घड्याळ सकाळपासून सारखं मार्ग पडतंय कीं काय ? अजून बारा कसे वाजत नाहींत ? मी कॉलेज-कडे जावयाला कां निघालों नाहीं ? कांहींतरीच विचार मी करीत आहें झालं !

एकदांचे बारा वाजले ! आम्ही मित्र-मंडळी कॉलेज-कडे निघालों. प्रत्येकाच्या मुद्रेवर उत्साह उधळत आहे. विजयाचा पूर वाहतो आहे. कसला विजय ? कॉलेजमध्यें प्रवेश ?

इकडून हा तिकडून तो करीत करीत एका घोळक्यानं आम्ही चाललों आहोंत. जणूं कांहीं एकप्रकारें दिंडीच ! आणि खरं म्हणजे " पदवी " पंढरीचे आम्ही वारकरीच नाहीं का ? आतां स. प. ची अवाढव्य इमारत आमच्या दृष्टिपथांत आली आहे !

वास्तविक ही इमारत आम्ही कितीतरी वेळा पाहिली आहे ! नटलेल्या मुली आणि खिदळणारीं मुलं फाटकांतून आंत बाहेर येतां जातां दिसलीं होतीं ! आम्ही पण त्याच फाटकांतून चाललों होतों ! त्या विशाल इमारतीच्या अंतरंगांत पहिलं पाऊल टाकण्यासाठीं चाललों होतों ! मी हसत होतों. नव्या जुन्या मित्रांचं स्वागत करीत होतों. सर्वत्र वातावरण नवीन होतं. उत्सुकता वाढविणारं होतं ! परंतु मला सर्वांत कुतूहल वाटत होतं तें या कॉलेजमधील प्रोफेसरांबद्दल !

या कुतूहलाचं कारण म्हणजे आमच्या शाळेंतील शिक्षकांनीं या प्रोफेसर मंडळींचा करून दिलेला परिचय ! " मी एवढं जीव तोडून सांगतों तरी तुम्हाला कळत नाहीं. उद्यां कॉलेजमध्यें गेल्यावर कसं होणार ? तिथले प्रोफेसर धाडधाड येतात, फाडफाड बोलतात आणि ताड-ताड करीत निघून जातात. तुम्हाला कळलं कीं नाहीं याची चवकशी करीत बसत नाहींत. "

कमी अधिक प्रमाणांत आमच्या बऱ्याच शिक्षकांनीं वरील उद्गार कधींमधीं काढले होते ! असे प्राध्यापक खरोखर कसे असतील ? माझ्या मनांत पुन्हा पुन्हा तोच

प्रश्न येत होता.

या प्रश्नाच्या तंद्रींतच मी आवारांत आलों. असंख्य रंगांनीं तें भरून गेलं होतं ! या रंगांपुढें आकाशांतील इंद्रधनुष्यानं देखील लाजावं ! तांबड्या, गुलाबी, निळ्या जांभळ्या रंगांचं सम्मेलन भरलं होतं ! एकदम वसंत फुलला होता.. बहरला होता ! फुलं उमललीं होतीं. रोज उमलणार होतीं ! आनंदाला उधाण आलं होतं ! प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एकच भावछटा उसळत होती ! आनंदाची, उत्साहाची ! केवळ कपड्यांतील रंगांचीच विविधता नव्हती तर शारीरिक रंगांचे देखील असंख्य नमुने दिसत होते ! कुणी गोऱ्या रंगाचा तर कुणी काळ्या रंगाचा (आणि कोणी गोऱ्या रंगाची तर कुणी काळ्या ! )

सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य आणि उत्साह होता, तरी त्यांत किंचित् काळजीच्या छटांचं मिश्रण झाल्याचं दिसत होतं ! कदाचित् माझ्या मनांतील धागधुग माझ्या प्रत्ययाला आली असेल ! मी बुजलों होतों. कुठंतरी अगदीं नवीन वातावरणांत वावरत आहें असं वाटत होतं ! आणि एक भीतीहि पण माझ्या मनांत दाटली होती ! " कॉलेज आपल्याला झेपणार का ? " राहून राहून मला वाटत होतं. एक चित्र माझ्या डोळ्यांसमोर तरळत होतं. मावळांतल्या तांबड्या भुरक्या रस्त्यांतील धुरळा उडवीत आमची गाडी चालली आहे. तिला वेग येऊं लागला आहे ! मलाहि असं वाटत आहे की, आपल्याहि जीवनाला वेग येत आहे ! परंतु मनांत मात्र मात्र एक वाक्य पुन्हा पुन्हा घोळतं आहे. " रवी, हें कॉलेज वाटतं तितकं सोपं नाहीं रे. नीट अभ्यास करा."

**व्यथा....**

**आकाशांत चन्द्र**
**हंसलाच नाहीं.**
**पिठूळ चांदणें**
**पडलेंच नाहीं.**
**पथिकाला वाट**
**दिसलीच नाहीं.**
**काळोखांत किर्रे**
**वाजलेंच नाहीं.**
**व्याकुळला जीव**
**सुखावला नाहीं.**
**व्यथा माझी तुला**
**कळलीच नाहीं.**

**—यशवन्त भिमाले,** ( टी. वाय्. बी. ए. )

गाडी सुटतांना वडिलांकडून मिळालेला शेवटचा इशारा !

भर दुपारचीं उन्हं तळपत होतीं. गटागटानं गप्पा चालू होत्या. अंगांतील कपड्याप्रमाणें बोलण्यालाहि रंग आला होता ! शेवटीं हा सर्व रंगांचा सागर " देवी रमाबाई हॉलच्या " मोठ्यामोठ्या दारांतून आंत शिरूं लागला.

मी आंत प्रवेश करीपर्यंत सर्व खुर्च्या भरून गेल्या होत्या. हॉल " हाऊस फुल्ल " झाला होता ! अगदीं आदळत आपटत एका कोपऱ्यांत जाऊन पोंचलों आणि टाचांची कसरत करीत पुढें सरकूं लागलों. प्रिन्सिपॉल साहेब टाळ्यांच्या गजरांत बोलायला उठले !

" मी तुमचं स्वागत करतों. तुमची बॅच खरोखर भाग्यवान आहे. बरोबर चार वर्षांनीं तुम्ही पदवीधर होणार—सतत पास होत गेल्यासच—( हास्य ) आणि त्याच वेळीं आपल्या कॉलेजचा सुवर्ण महोत्सव साजरा होणार. " [ प्रचंड टाळ्या ] भाषणाच्या ओघांत त्यांनीं कॉलेजचीं वैशिष्ट्यें व महान् परंपरा यांची माहिती सांगितली. मला माझाच अभिमान वाटूं लागला......

अध्यक्षांचं भाषण सुरू झालं, " गंगेसारखं जीवन असूं द्या. निर्मळ आणि उपकारक ! तुम्ही कोणीहि व्हा परंतु मानव बना ! " पुन्हा टाळ्या. मुग्धपणें मी ऐकत होतों. मनांतील कशाला तरी जागृति येत आहे असं मला वाटत आहे. परंतु मी जसा येतांना ढकलत ढकलत आंत आलों होतों तसाच ढकलत दाराकडे जाऊं लागलों. त्या गर्दींतून बाहेर पडणं एक दिव्य होतं. परंतु थोड्याच वेळांत माझी ढकलगाडी बाहेर पडली. माझीं पावलं फाटकाकडे वळलीं. माझ्या सभोंवतीं सारं उत्साही वातावरण होतं ! चिरतरुण अशा महाविद्यालयीन वातावरणांतील तो माझा पहिलाच दिवस होता !

चालत असतां कॉलेजच्या विस्तीर्ण वातावरणांत माझी दृष्टि भिरभिरत होती. आवारांत मध्यभागीं शिस्तबद्ध असं सुंदर वनस्पतींचं वर्तुळ दिसत होतं. त्यांत टिळकांचा पुतळा होता. त्यामागें "Sir Parshurambhau College " ची भव्य इमारत उन्हांत तळपत होती. माझं कॉलेज...पन्नास वर्षांची परंपरा असलेलं माझं कॉलेज....एक सूक्ष्म भावछटा माझ्या हृदयाला तीव्रतेनें स्पर्शून गेली ! त्या दगडी इमारतींत चैतन्य भरून राहिलं आहे असं मला वाटूं लागलं !

उचंबळणाऱ्या परंतु महाविद्यालयीन जीवनांतील पहिल्या दिवसाची उत्कंठा संपलेल्या मनानं मी चालू लागलों...माझीं पावलं फाटकांतच रेंगाळत होतीं....

☆

परशुरामीय निबंधस्पर्धा–पारितोषिक क्र. २

# महाविद्यालयांतील माझा पहिला दिवस

सुरेश दत्तात्रय देव, पदवीपूर्व साहित्य

शालेय शिक्षणाचें पर्व संपलें नि आतां महाविद्यालयीन पर्व सुरू झालें. परंतु शालेय जीवनांतल्या कांहीं स्पृहणीय नि स्मरणीय स्मृति अजूनहि तरळत आहेत.

मी महाविद्यालयांत प्रविष्ट झालों नि माझं खरं आयुष्य येथूनच सुरू झालं ! 'सायन्स'ची झंझट नको म्हणून आर्टस्‌कडे वळलेला मी एक 'फ्रेश' विद्यार्थी ! महाविद्यालयांत पहिलं पाऊल टाकलं अन् मला गोंधळल्यासारखं झालं ! जिकडे पहावें तिकडे रंगीबेरंगी छटा दृष्टोत्पत्तीस आल्या.

मुलामुलींचे घोळके पाहिले कीं, कांहींतरी नवीन पाहतोंय याची जाणीव मनाला होत होती. शाळेंत चुकून सुद्धां कधीं मुलींचं न घडणारं दर्शन येथें सर्रास नि राजरोसपणें घडत होतं. एकंदरीत ती गर्दी नि ते बहुतेक अनोळखी चेहरे पाहून माझी तर त्रेधातिरपीटच उडाली. कुठं जायचं ? कसं जायचं ? कांहींच आकलन होईना. शेवटीं अनुभवी मुलांच्या घोळक्यांत शिरलों नि रोलनंबर व ॲडमिशन नंबर प्राप्त करून घेतला. त्याचबरोबर वर्गहि सांपडला पण नवीनच अडचण उद्भवली ! बसायचं कुठं ?

लांबचलांब असा तो वर्ग पाहून प्रथम भीतीनें जागा घेतली नि त्याचें रूपांतर वेंधळेपणांत झालें. मुलामुलींनीं एकत्र बसायचें ही कल्पनाच कशीशी वाटूं लागली. शेवटीं एका बांकावर अंग चोरून बसलों !

घटका–पळें भरलीं नि घंटेच्या ठोक्यानं तासाच्या प्रारंभाची सावधानतेची सूचना दिली. एकाच क्षणांत सगळीकडे स्तब्धता पसरली. प्रोफेसरांनीं आपला वर्ग शोधून काढला. पण हाय रे दैवा ! पहिलाच तास इंग्लिशचा ! प्रोफेसर काय बोलताहेत तेंच समजेना. शाळेंत सारा कारभार मराठींतून नि येथें इंग्रजीचे मोठमोठे शब्द नि वाक्यं कर्णपटलावर येऊन आदळत होतीं. पण मेंदु आपलं कामच करायच्या मूडमध्यें नव्हता. प्रोफेसरांनीं बडबड केली खरी पण एक अक्षर कळलं असेल तर शपथ !

नंतर मात्र मराठीच्या प्रोफेसरांचें विद्वत्ताप्रचुर नि अनुभवपूर्ण भाषण ऐकून महाविद्यालयाबद्दल थोडा आदर वाटूं लागला. एवढं सगळं झालं तरी एक गोष्ट सांगावीशी वाटते, नि ती म्हणजे शाळेसारखं सुख येथें नाहीं. सगळी अभ्यासाची जबाबदारी आपल्यावरच ! सगळं कांहीं आपल्यालाच करावं लागतं नि जबाबदारी येऊन पडल्यामुळं आपण मोठे झालों असा भास होऊं लागतो.

आर्ट्‌स्‌चें अर्थशास्त्र आम्हांला अगदींच आगळें होतें. प्राध्यापक, घाईघाईत व्याख्यान देत होते. शाळेंत आम्हांला टिपणं घ्यावयाची संवय नव्हती त्यामुळें गोंधळच उडाला. एक शब्द लिहायला जावें तर दुसरा विसरून जाई व दुसरा शब्द आठवण्याचा प्रयत्न केला कीं, तेवढ्या वेळांत प्राध्यापक पुढें गेल्याचें आढळून येई. अशी केविलवाणी स्थिति झाली होती माझी नि माझ्या मित्रांची !

शाळेची खूपखूप आठवण होई पण 'शाळकरी पोर बनणं मात्र नाहीं आवडणार मला' याचीहि जाणीव होई. शाळेसारखं वैयक्तिक लक्ष पुरविण्याचं काम मात्र येथें कोणींच करतांना आढळून आलें नाहीं. थोड्याच कालावधींत मित्रसंगतहि मिळाली पण शाळेसारखा त्यांच्याबद्दल जिव्हाळा नि प्रेम मात्र वाटलंच नाहीं. पोरकटपणा तर येथें मुळींच चालत नाहीं. विद्यार्थ्यांना मोठेपणानं वागविण्यांत येतं. शाळेपेक्षां कितीतरी पटीनं जास्त सवलती येथें मिळतात–कुणी त्याचा सदुपयोग करतो तर कुणी दुरुपयोग !

प्रोफेसर अगदीं तिऱ्हाईताप्रमाणंच वागतात सगळ्यांशीं. असं जरी असलं तरीसुद्धां उच्च–नीच असा भाव मात्र त्यांच्यांत मला मुळींच आढळला नाहीं. वर्गांत यायचं, ठराविक विषय शिकवायच्या, अडचणी समजावून घ्यायच्या नि त्यांचें निवारण करायचें, तास संपल्याचं सूचित झालं कीं, वर्गाबाहेर चालूं लागायचं असा त्यांचा कार्यक्रम ठरून गेला आहे, नि त्यांत तीळभरहि उणीव पडणार नाहीं.

महाविद्यालयीन जीवनांत प्रवेश केल्यामुळं बऱ्याचशा आशाआकांक्षा मी बाळगून होतों. बरेचसे मनोरेहि रचले होते. पण पहिल्याच दिवशीं तिसऱ्या तासाला ते मनोरे आकस्मितरीत्या ढांसळून पडले नि त्यांची फक्त माती माझ्या हातीं लागली. अखेर असं कळून आलं कीं,

महाविद्यालय ही चैनीची जागा नाहीं; प्रेमनिर्मितीचं ठिकाण नाहीं, तर आपलं खरखुरं कर्तृत्व दाखवून नांव कमावण्याचें ठिकाण आहे. कांहींतरी चमत्कार केल्याशिवाय आपणाला कोणीच नमस्कार करणार नाहीं. ह्याचीहि खात्री पटली नि मग शीड नसलेल्या जहाजाप्रमाणं भरकटत गेलेलं माझं मन शांत झालं, स्थिर झालं. मनांत जी एक पोकळी निर्माण झाली होती त्याची जागा ' जबाबदारीनं ' भरून निघाली. स्वत्वाची जाणीव झाली नि तसे प्रयत्न करण्याचंहि निश्चित केलं !

टोलेजंग नि गगनचुंबी इमारत, अवाढव्य व्याप असलेली प्रयोगशाळा, अफाट ज्ञानभांडार असलेलें वाचनालय हीं जशी महाविद्यालयाच्या कीर्तींत भर टाकतात, पूर्वस्मृतींना उजाळा देण्याचें कार्य करतात तद्वतच अफाट ज्ञान संपादन करून प्रथम श्रेणीचं यश मिळविणारं विद्यार्थीहि महाविद्यालयाच्या महत्तेंत भर घालून आपलं नांव उज्ज्वल करतात.

विचारचक्रांत गुरफटलेला मी धडपड करूं लागलों नि मला एक धागा मिळाला. खूप परिश्रम करून उत्तम यश संपादण्याचा मी लगेच निश्चय केला. अखेर शेवटीं महाविद्यालय सुटण्याची घंटा झाली. माझी तंद्री भंग पावली, क्षणभर मला त्या शिपायाचा रागच आला ! पण नाइलाजास्तव मुग्धपणें. वर्गाबाहेर पडलों नि परत बाह्य जगांत सामील झालों.

घोळक्या घोळक्यानें उभे राहिलेल्या विद्यार्थि–विद्यार्थिनींच्याकडे विस्मयानं पाहातच महाविद्यालयाचं अस्तित्व जाणवून देणारं भव्य प्रवेशद्वार ओलांडलं नि रहदारींत सामील झालों.

## मी चुकलों जीवनवाट

गडबडलें नभ सारें
खडबडुनी उठली धरती
लखलखत्या बिजलीच्या या
नभगर्भांतुन ठिणग्या उडती

त्या ठिणग्या सरशी सारे
ढग हुंकारत थरथरले
गडगडाट भीषण करुनी
गिरिशिखरां येउनी भिडले

घेऊनी गारवा जहरी
वारा पिसाट सुटला
तो धारांच्या कैफांत
गन्धाकुल होवुनी घुमला

या वाऱ्याच्या स्पर्शानें
अंगांगा कांटा फुटला
पण धारांच्या अभिषेकीं
मी सुखवित होतों त्याला

अन् मनीं खिन्नता दाट
पूर्वींचा आठव होता
या अशाच एका दिवशीं
मी चुकलों जीवनवाट–

—शरश्चंद्र द. वैद्य,
( प्रथम वर्ष साहित्य )

# बहिणाबाईचीं गाणीं

लेः– **विजय सुराणा,** ( टी. वाय्. बी. ए. )

—बरींच वर्षे भासाचीं नाटकें अज्ञातवासांत होतीं. तीच स्थिति लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांची ! बहिणाबाईचीं गाणींहि बरेच दिवस अज्ञातवासांत होतीं; तीं साधारणतः दहा वर्षांपूर्वीं अत्र्यांच्या आग्रहामुळें साहित्याच्या दरबारांत प्रविष्ट झालीं. प्रतिभा अभिजात नसते, असें मानून केवळ प्रज्ञेच्या जोरावर प्रतिभेचीं कारंजीं उडविण्याच्या भोंगळ वल्गना करणारांना बहिणाबाईचीं गाणीं हा खणखणीत नाण्यासारखा पुरावा आहे. एका निरक्षर खेडवळ बाईच्या साध्याभोळ्या गीतांतून उत्कट आशय व्यक्त झालेला पाहून प्रज्ञ मनास साश्चर्य कौतुक वाटतें. तिच्या दर्शनानें प्रतिभा ही अभिजात असते. यत्न किंवा प्रज्ञा यांचा तिच्याशीं फारसा संबंध नसतो, अशीच अत्र्यांसारखी आपलीहि प्रामाणिक समजूत होते.

—बहिणाबाई मूळच्या खानदेशांतील ! त्यांच्या गीतांची धाटणी अहिराणी आहे. विषयांची विविधता हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. पेरणी, कापणी, रगडणी व उपणणी यासारख्या शेतांतील विविध कामाच्या वेळीं त्या गुणगुणत असत. झेंडूलांबोवापासून ( हा बुवा अजूनहि खानदेशमधील माझ्या एका मित्राच्या घरीं येतो ) ते राधा महारीण अंगण कशी झाडून गेली, येथपर्यंतचे सर्व विषय बहिणाबाईच्या गीतांनीं हाताळले आहेत. त्यांच्या मुखांतून सुटलेले शब्द जणुं पीयूषांत सचैल स्नान करून आल्यासारखे वाटतात. ते वांझोटे नाहींत, अर्थगर्भ आहेत. त्यांच्या अंगीं माधुर्य आहे, सौकुमार्य आहे. त्यांच्या गीतांत सृष्टीचें वेड आहे, तान्ह्याचे लाड आहेत, ईश्वराची ओढ आहे आणि नातेवाईकांचे कोड आहेत. टाळ–मृदंगांत दंगलेल्या वारकऱ्यांचें हिरवें कौतुक करावयासहि त्या विसरल्या नाहींत. उत्कट भक्तीचा स्वैर आविष्कार त्यांच्या गीतांत आढळतो. त्यांच्या गीतांत प्रचण्ड प्रभंजनाचा प्रस्फोट नाहीं कीं, नवपरिणितेचा क्षणभंगुर मवाळपणा नाहीं. चारुगात्रीच्या मंद अन् डौलदार चालीसारखा ताल त्यांच्या गीतांना आहे. जीवनांतील जिव्हाळ्याचे भिन्न भिन्न प्रसंग त्यांनीं वेंचक शब्दांत अचूकपणें टिपले आहेत.

काव्याची व्याख्या शेक्सपियरपासून शेलीपर्यंत सर्वांनीं केली. बहिणाबाई पडल्या अडाणी ! शाळा हें नांव त्यांना ऐकूनच माहीत असावें ! आपल्या गीतांबद्दल त्या म्हणतात—

" अरे घरोटा घरोटा
तुझ्यांतून पडे पीठी
तसं तसं माझं गाणं
पोटांतून येतं व्होटी."

' जात्यांतून जसें पीठ गळतें, तसें माझें गाणें ओंठांतून झिरपतें.' किती साधें कथन ! किती प्रामाणिक ! किती समर्पक !

——संसाराचें शाश्वत रहस्यहि त्यांनीं आपल्या गीतांत उघड केलें आहे—

बरा संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर
आधीं हाताले चटके
तव्हां मियते भाकर.

अशा संसाराला खोटा म्हणूं नये. राऊळाच्या कळसाला कां कोणी लोटा म्हणतं ? लोक संसाराला लोढणं समजतात. अशा लोकांना बहिणाबाई समजावतात——

येड्या, गळ्यांतला हार
म्हणूं नको रं लोढनं.

——' पॅरडाइज् लॉस्ट् ' मध्यें मिल्टन म्हणतो, ' मन स्वर्गाचें नरक बनवतें तर नरकाचा स्वर्ग ! ' बहिणाबाई म्हणतात, मन जहरी आहे. त्याचं तंत्रच ' न्यारं ' आहे ! असल्या मनापेक्षां त्यांना विंचू, साप बरा वाटतो; कारण त्यांना मंत्राचा तरी उतार पडतो ! मनाला कशाचा उतार पडणार ? तें हट्टी आहे. पिकांवर पहुडलेल्या पांखरांसारखें पुनः पुन्हां हाकललें तरी तें फिरून पुन्हां पूर्व स्थळीं येतें. परमेश्वरास त्या ' यवगी ' म्हणतात. आणि जागेपणीं तुला कुठें असें असें स्वप्न पडलें का म्हणून विचारतात.

——ज्यावेळीं स्वप्नांचे इंद्रधनुष्यीं रंग उधळावयाचे असतात, आशांना अंकुर फुटतात, आकांक्षांना पालवी फुटते त्या नव्हाळीमध्येंच त्यांना वैधव्याचा स्वीकार करावा लागला. कुंद धुक्यांतील निःश्वास टाकणाऱ्या हिरव्या चाफ्याचा गंध विरला....उरले उसासे ! केवळ उसासे !! इब्सेनच्या ' द घोस्ट ' नाटकांत हतभागी

मातेचा पुत्र पागल बनतो. पित्यानें केलेल्या पापाचें प्रायश्चित्त त्याला भोगावें लागतें. शेवटीं त्याच्या साध्या-भोळ्या शब्दांत रसिकांच्या आसवांना पुकारण्याचें सामर्थ्य आहे. तसेंच बहिणाबाईच्याहि साध्याभोळ्या शब्दांत कारुण्य पाझरलें आहे. त्या म्हणतात—

लपे करमाची रेखा
माझ्या कुकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुकू
रेखा उघडी पडली

विधवेच्या दारुण दशेचें वर्णन 'उघडी पडली' या साध्या शब्दांत करुणपूर्ण झालें आहे.

वर्ड्सवर्थसारखें निसर्गाचें अमाप वेड त्यांच्या गीतांत नाहीं कीं शेलीसारखें 'सुपर नॅचरल एलिमेंट'मध्यें त्यांचीं गीतें रंगत नाहींत. किंबहुना बायरनसारखी स्वातंत्र्याची तुतारीहि त्यांनीं फुंकली नाहीं. त्यांच्या काव्याचा प्याला जीवनांतील विविध विषयांनीं कांठोकांठ भरला आहे. अचेतनावर चेतनत्वाचा आरोप बालकवीं-इतकाच बहिणाबाईंनींहि लीलया केला आहे—

'धरत्रीच्या कुशीमधी
बी बीयानं निजलीं
वऱ्हे पसरली माटी
जशी शाल पांघरली

....बी पेरलें. कोंब आले. पीक फोंफावलें, तरारलें ...बहिणाबाईंना वाटतें छे ! शेत गहिवरलें आहे. दोन पानें प्रगटलीं. त्यांनीं हात जोडले आहेत ! तीं देवाच्या भजनांत दंग झालीं आहेत, असें त्यांना वाटतें. टागोरां-सारखींच ईश्वराविषयीं बहिणाबाईंच्या मनांत अपरंपार भक्ति आणि कृतज्ञ भाव आहे. देवमाणूस शेवटीं देवाघरीं गेला, असें वर्णन जयरामबुवाच्या परलोकवासाचें त्यांनीं केलें आहे.

—'काय घडे आवगत 'मध्यें एका प्रसंगाचें वेधक चित्रण आहे. हाऱ्यांतल्या सोपानदेवाजवळ नाग आला. तो त्या तान्ह्याशीं खेळत होता. बहिणाबाई म्हणतात—

सोता व्हयीसनी तान्हा
माझ्या तान्ह्याशीं खेयला

पांवरीचा सूर ऐकतांच नाग निघून गेला. अशा नागास पुढच्या पंचमीला ये. तुला दुधाची वाटी देईन, असें कृतज्ञतेनें सांगण्यासहि त्या विसरल्या नाहींत. आप्पा महाराजांच्या परलोकवासाचेंहि वर्णन त्यांनीं करुण शब्दांत केलें आहे. पावसाच्या सरीसारखे लोकांचे अश्रु गळाले, असें त्या म्हणतात.

——बहिणाबाई रागवतसुद्धां असत ! मानवाची दांभिक नीति पाहिल्यानंतर त्यांना वाईट वाटायचें. अशा माणसां-पेक्षां गोठ्यांतलें जनावर बरें, असें त्यांना मनोमन वाटतें. तें प्रामाणिक असतें अशी त्यांची प्रांजल समजूत होती. अशा माणसाला त्या आवाहन करतात——

मानसा मानसा
कधीं व्हशील मानूस

'कशाला काय म्हनूं नही ?' मध्यें तर त्यांच्या क्रोधाचा पारा चढलेला दिसतो. बिना कपाशीनें उलतें त्यांस बोंड म्हणूं नये, असें त्या म्हणतात. पुढें मात्र शब्दांना धार येते——

हरी नामाईना बोले
त्याले तोंड म्हनूं नही

## किती....किती

किती सांवरला तोल
किती आंवरला बोल
तुझ्या-माझ्या नयनांत
जुनें पाणी खोल खोल

किती सांभाळली वाट
किती सांभाळला घाट
तरी वळणावरतीं-
आज रेंगाळे पाऊल...

किती लपविला शब्द
किती लपविला अर्थ
तरी भावनांची भाषा
आली स्वप्नें पालवीत...

आली लाट भरतीची
आली लाट सरतीची
तरी पुळणीवरती-
स्वप्नें भिजतीं रात्रींचीं !

किती कितीक स्मरण
किती किती विस्मरण-
जरी विसरला हात
मागें राहिलेलें दान !

—बाळ कारले

किंवा— आखाडला दानासाठीं,
त्याले हात म्हनूं नहीं.

——बहिणाबाईंच्या ठायीं विनोदी वृत्तीहि होती. रुसलेल्या वरमाईचें वर्णन त्यांनीं खालील शब्दांत केलें आहे——

‘ रुशी बसे वरमाय
तिचा रुसवा रे केवढा ?
“ म्हने पापड वाढला
कसा वाकडा तिकडा ? ”

त्यांना फुंकणी सांपडेना. तेव्हां त्यांनीं फुंकणीस नूरी पटवेकरणीची उपमा दिली. ही बाई त्यांच्याच वाड्यांत राहात असे. कधीं कुठें जाईल—पत्ता नाहीं ! त्याचप्रमाणें छोटूभय्याच्या शब्दचित्रांतहि विनोदी वृत्ति प्रगट होते.

तुझे डोये सदा लाल
त्याच्यांतून गये पानी
तुज्या नाकाची ठेवन
भज्या गुलगुल्याच्यावानी

आधुनिक काव्यांत श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या उपमेचें वैशिष्ट्य रसिकांच्या नजरेसमोर आहेच. तथापि, संस्कृत शब्द वापरण्याच्या अट्टाहासामुळें त्यांचा डौल कमी झाल्यासारखा भासतो. नेमकें या उलट बहिणाबाईंचें आहे. त्यांचें काव्य वाचल्यानंतर ‘ त्यांच्यासमोर कल्पना व उपमा दासीप्रमाणें व यमक श्लेष पट्टेवाल्याप्रमाणें उभे असत ’ हें श्री. सोपानदेव चौधरी यांचें विधान अतिशयोक्त वाटत नाहीं. माय भीमाई ‘माउली’ त्यांना अंब्याच्या सांवलीसारखी वाटते. माहेरची वाट मखमलीसारखी वाटते. मोटेचें पाणी कुंडांत पडतें त्याचं वर्णन अतिशय सुंदर शब्दांत त्यांनीं केलें आहे——

वसांडली मोट
करे धो धो थायन्यांत
हुंदडतं पानी
जसं तान्हं पायन्यांत !

‘ हुंदडत ’ हा क्रियानिदर्शक शब्द समर्पक आहे. ‘ थायन्यांत ’ ‘ पायन्यांत ’ किंवा ‘ साउली ’ ‘ माउली ’ अशीं यमकेंहि अकृत्रिम भासतात.

बहिणाबाईंनीं रेखाटलेलीं शब्दचित्रें हा स्वतंत्र रसास्वादाचा विषय होईल.

हळव्या मनांतील भावनातिरेकाच्या असावध क्षणांत जन्मलेलीं हीं गीतें चिरतरुण राहतील आणि रसिकांना मंत्रमुग्ध करून सोडतील, यांत तिळमात्र शंका नाहीं.

卐 卐

## रजनीच्या पदरांत

हिरवाळी पाटावर
केली प्रकाश रांगोळी
लाल कुंकवाचा टिळा
तिच्या लावला कपाळीं ।

आली आतां सांजवेळ
हातीं घेऊन तबक
ओवाळीते रजनीला
मुग्ध भावना कितीक ।

ओंजळींत तांदळाच्या
हळूं ठेविला नारळ
रजनीच्या पदरांत
भरे ओटी सांजवेळ ।

—शरद गजानन वाघ,
( तृतीय वर्ष साहित्य. )

# न पाहिलेली गंगामाई

कु. **सरोज गजानन कुलकर्णी** ( एफ्. वाय्. बी. एस्सी. )

मी अजून गंगानदी पाहिली नाहीं. हिंदुस्थानांतील बहुतेक मोठ्या नद्या मीं न पाहिलेल्याच आहेत. इतक्या नद्या मी पहाणार तरी कशी ? शेवटीं नकाशांतून नद्यांचीं भौगोलिक स्थानें पाहून नि लेखकांनीं त्यांच्या कांठच्या रम्य अन् सुपीक प्रदेशांचीं केलेलीं वर्णनें वाचूनच मी समाधान मानतें.

भारतांतील सर्व नद्यांमध्यें गंगा ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. महाकवि कालिदासाच्या ' रघुवंशां ' त गंगा-किनारची अपूर्व शोभा प्रतिबिंबित झाली आहे. गंगा-मातेनें लोकांना जीवन दिलें. त्यांना पापमुक्त केलें. गंगेचें हें दैवी सामर्थ्य पाहून कविवर्य मोरोपंतांनीं तिचा ' अमर तटिनी ' म्हणून उल्लेख केला आहे. ' सर्व जीवसृष्टीचे अनंत भव्यसंपदे ' असा गंगेचा गौरव करून, " दीन मयूर गळा पडला शरणागत हा अभयोचित गंगे " असं म्हणून कविवर्य गंगेला शरण गेलेले आहेत. जगन्नाथ पंडितांनींहि ' गंगा लहरी ' गाऊन गंगेची स्वर्गीय शोभा अगोदरच प्रगट केली आहे. वामन पंडितांनींहि ' विलोकिता जीतें भवभय-जनांचे परिहारी " अशी गंगेची महति गाइली आहे. अशी ही लोकमाता—

> फेडित जगाचे पापताप
> पोषित तीरींचें पादप
> जाय जैसें आप—जानव्हीचें

अशा तऱ्हेनें आपली कर्ममय उपासना करण्यांत आणि जीवसृष्टीला सुखविण्यांत गढून गेली आहे.

' हिमवत्प्रभवः पंथ्याः पुण्या देवर्षि सेविताः । '
असें दोन हजार वर्षांपूर्वी चरकानें लिहून ठेविलें आहे.

अशा तऱ्हेचीं गंगेत्रीसंबंधीं अनेक वर्णनें मीं वाचलीं आहेत अन् त्या वर्णनांचा परिणाम माझ्या मनावर इतका अनुकूल व दृढ झाला आहे कीं, ही नदी प्रत्यक्ष पाहाण्यास जायलाच नको असं वाटतं. न जाणों मनावर झालेला तो रम्य संस्कार प्रत्यक्ष दर्शनानें उडून जावयाचा ! त्याचा काय नियम ? वाचलेलीं सर्व वर्णनें एकमेकांत मिसळतात अन् त्याचें एक मोठें नाजुक, देखणें, प्रमाणबद्ध स्वप्न नेहमीं मनापुढं उभं रहातं. मीं जर खरंच गंगा पाहिली, तर तें स्वप्न कदाचित् विरूनहि जाईल. लेखकांनीं असा कांहीं संमिश्र मेळ बसविला आहे कीं, एक प्रकारचं सुंदर नि दिमाखदार असं चित्र गंगामाता म्हटल्यावर मन'चक्षू-पुढं उभं राहतं. अर्थात् गंगादर्शनानंतर तें चित्र जर भंगलं तर मनःकोषांतील एक रमणीय मूर्ति मी आपण होऊन फोडून टाकली असं होईल. म्हणून गंगोत्री पाहावयास जावयाच्या कल्पनेनेंच मला भय वाटतें.

याखेरीज एकदां भगिरथानें महान तपश्चर्या करून पृथ्वीवर आणलेल्या या पवित्र अशा गंगामातेचें दर्शन घेतल्यावर अन् तिच्या निर्मळ पवित्र जलांत स्नान करून पापमुक्त झाल्यावर जीवनांत कांहीं करायचं किंवा पहायचं राहिलंच नाहीं असंच लोक म्हणतात. ही बाब तर फार भयंकर आहे; कारण एकदां या गंगामाईचं दर्शन घेतल्यावर अधिक सुंदर व पावनतम अशी एकहि गोष्ट पहावयाची शिल्लकच रहाणार नाहीं. सर्वोत्तम, पावनतम अशा स्थळांचं दर्शन होऊन चुकल्यावर जगां-तील इतर वस्तु सामान्य वाटूं लागतात; व जीवितांत कसलाहि राम उरणार नाहीं. त्यापेक्षां सर्वोत्कृष्ट, पावन-तम अशी वस्तु बघावयाची अजून राहिली आहे ही जाणीव एक मनोज्ञ अपेक्षा जिवंत ठेवते व कांहींतरी साध्य अजून आहे, कोठेंतरी अजून पोहोंचावयाचें आहे; आजवर जें झालें तें कांहींच नाहीं या अपूर्णतेचें ज्ञान होत राहिलें तर पूर्णतेविषयीं आपली कल्पना अधिकच उदात्त होईल. म्हणूनच मला पुष्कळदा वाटतं कीं, गंगोत्री अजून पाहूंच नये.

कांहीं सौंदर्येंच अशीं असतात कीं, कसल्याहि चिकित्सकाचें त्यानें समाधान व्हावें. प्रत्येक सौंदर्य माणसाच्या रुचीला हमखास प्रमुदित करेलसें वाटत नाहीं. त्यांत कोठेंतरी एखादी बोटचेपी जागा असतेच, तीच जर का दृष्टींत भरली तर बाकीचा सौंदर्यविस्तार वाया गेला म्हणून समजावें. हास्य कितीहि लोभनीय असलं व त्याच्या संस्कारानं मुखमण्डल कितीहि प्रफुल्लित झालेलं असलं, पण जर का हिरड्या काळ्या व बटबटीत असल्या व बाहेर दिसल्या तर तें मुखमंडल कुरूप झालंच म्हणून समजावं. रसिक सर्व कांहीं पहाणार, बारीकसारीक पहाणार व मनाचा धडा शुद्ध सौंदर्यानें



**एन्. एम्. जोशी**
इंडियन एअर फोर्समध्यें
अधिकारी शिक्षणासाठीं निवड.



**कु. लीला भिडे**
बी. एस्सी. ( पहिला वर्ग )



**प्रा. डॉ. आर. जी. कुलकर्णी**
पीएच्. डी. पदवी मिळविली.



**वसंत कृष्णराव होनवाड**
एम्. एस्सी. ( प्रथम वर्ग )
प्रथम क्रमांक



**कमलाकर सोपानराव धेंडे**
आर्किटेक्ट व ड्रॉईंग स्पर्धांत
पारितोषिकें.



**भालचंद्र बळवंत फडके**
एफ्. वाय्. बी. ए. परीक्षेंत
लोकमान्य टिळक शिष्यवृत्ति.



**व्ही. आर. सरनाईक**
प्री. प्रोफेशनलमध्यें रँ. परांजपे
गणित शिष्यवृत्ति.



**कु. मीना यादव**
जागतिक ' गर्ल गाईडस् '
मेळाव्याकरितां निवड.



**शरश्चंद्र गंगाधर काळे**
एम्. ए. प्रथम श्रेणी प्रथम क्रमांक
आणि पारितोषिक.

# कै. वामन माधव दबडघाव



कळविण्यास अत्यंत दुःख होतें कीं, आपल्या महाविद्यालयांतील भौतिकी विषयाचे माजी प्राध्यापक वा. मा. दबडघाव यांचें दि. २२–९–१९६२ रोजीं देहावसान झालें. त्यांचा जन्म दि. ३०–६–१९०४ रोजीं भंडारा येथें झाला व शालेय शिक्षण जबलपूर येथें झालें. बाणेदार राष्ट्रीय वृत्तीमुळें ते शालेय जीवनांतच राष्ट्रीय आंदोलनांत ओढले गेले व केवळ अकरावींत असतांनाच नागपूर येथें १९२१ सालीं भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास ते जबलपूर शहर काँग्रेसचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहिले. त्यांचें उच्च शिक्षण नागपूरच्या सायन्स कॉलेजमध्यें झालें. नागपूर विद्यापीठांतून १९२५ सालीं बी. एस्.सी. व १९२७ सालीं एम्. एस्सी परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनीं विख्यात शास्त्रज्ञ सर डॉ. रामन् यांच्या मार्गदर्शनाखालीं 'Raman Effect' वर तीन वर्षे संशोधनकार्य केलें. 'Raman spectra under High Dispession' हा त्यांचा संशोधनात्मक निबंध विद्वन्मान्य झाला. त्या काळीं मोठी सरकारी नोकरी मिळण्याची संधि प्राप्त झाली असतांहि केवळ ध्येयवादी राष्ट्रीय वृत्ति व संशोधनाची आवड यामुळें रुपेरी शृंखलांचा मोह त्यांनीं टाळला. डॉ. रामन् यांच्या शिष्यांपैकीं कांहीं गुणी विद्यार्थी शिक्षण प्रसारक मंडळीमध्यें असावेत या कल्पनेनें प्राचार्य सब्नीस यांनीं डॉ. रामन् यांना अशा कांहीं विद्यार्थ्यांची शिफारस करण्याबद्दल लिहिलें. डॉ. रामन् यांनीं प्रा. वा. मा. दबडघाव यांची एकट्याची शिफारस केली. प्रा. दबडघाव हेही त्यागी वृत्तीनें सन १९३२ सालीं शिक्षण प्रसारक मंडळीस येऊन मिळाले. १९३३ सालीं शि. प्र. मंडळीचे आजीव सेवक म्हणून त्यांची निवड झाली. महाविद्यालयांत असतांनाच सन १९३८ सालीं यू. टी. सी. साठीं अधिकारी म्हणून त्यांची निवड झाली. या संघटनेंत त्यांनीं निष्ठापूर्वक अठरा वर्षें काम केलें. यू. टी. सी. चे यु. ओ. टी. सी. व नंतर एन्. सी. सी. मध्यें स्थित्यंतर झाल्यावर आपल्या महाविद्यालयांतील ते एकमेव शिक्षक या नवीन संघटनेंतही त्यागपूर्वक दाखल झाले. महाविद्यालयांतील 'सी' कंपनीचे सन १९५६ पर्यंत ते कपनी कमांडर होते. त्यावर्षी मेजरचा हुद्दा मिळवून ते एन्. सी. सी. मधून निवृत्त झाले.

सन १९४२ मध्यें नू. म. वि. प्रशाळेचे मुख्याध्यापक म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. व मध्यंतरीं दोन वर्षें सोडल्यास ही जबाबदारी त्यांनीं १७ वर्षें पार पाडली. त्यांच्या कारकीर्दींत प्रशाळेची सर्वांगीण प्रगति होऊन तिनें शालेय व अन्य. सांस्कृतिक कार्यक्रमांत उज्ज्वल यशाची परंपरा निर्माण केली.

सन १९४४ ते ४८ पर्यंत ते शि. प्र. मंडळीचे चिटणीस होते. याखेरीज नू. म. वि. विद्यार्थी भांडार, वर्धा हिंदी प्रचार संघ, मुख्याध्यापक संघ इ. अनेक संस्थांचे संसार त्यांनीं चालविले. त्यांनीं आपल्या कार्यानें मोठा मित्रपरिवार जमविला. परिचितामध्यें 'भय्यासाहेब' या नांवानें ते ओळखले जात. त्यांचें औदार्य त्यांच्या देहासारखेंच भव्य व उत्तुंग होतें. परमताबद्दलही आदर व अथांग सौजन्य यामुळें ते अजातशत्रु झाले होते. निगर्वी प्रेमळपणा व सहानुभूति यामुळें सहकाऱ्यांचा विश्वास व प्रेम त्यांनीं संपादन केलें. विद्यार्थ्यांच्या उन्नतीबद्दल अखंड तळमळ व विद्यार्थ्यांबद्दल पुत्रवत् प्रेम यामुळें विद्यार्थीवर्गामध्यें त्यांच्याबद्दल नितांत आदर व आत्मीयता वसत असे. भय्यासाहेबांच्या निधनानें शिक्षणक्षेत्रांतील एक ध्येयवादी कार्यकर्ता हरपला. त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दुःखामध्यें आम्हीही सहभागी आहोंत.

ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो !!!

भरून घ्यावा या आशेनें त्या हास्याकडं पहाणार! पण जर का त्यांत काळ्या हिरड्या दृग्गोचर झाल्या तर भरत आलेला घडा तो ओतून टाकील व चूळ थुंकून या झऱ्याच्या कांठावरून निघून जाईल. असली कांहीं अमूर्त भीति माझ्या मनांत सारखी डोकावते. म्हणून गंगा पहावी असं मला वाटत नाहीं, त्याऐवजीं मीं तें चित्र मनांत तसंच जपून ठेवलं आहे.

मृग नक्षत्रांतील डोक्यावरची ती मेघमाला, या क्षितिजापर्यंत पसरलेलें तें सतरंगी धनुष्य, रानच्या वाऱ्यानें व वासानें, लांडोरीच्या आवाहनानें खुललेला व सहस्त्र नेत्रांनीं तिजकडे पहात असलेला तो मयूर, गगनचुंबी हिमालयाचीं शिखरें अशांसारख्या सौंदर्याचा जो एक विशाल जामदारखाना माझ्या मनांत मीं कायमचा भरून ठेवला आहे, त्यांतच मी गंगामाईची सांठवण केली आहे. वरील सौंदर्यांना कधीं भंग आहे का? तसाच तो गंगामाईसहि नसला पाहिजे असा माझा आग्रह आहे, हट्ट आहे. कोणी तिजविषयीं खारटतुरट बोलूं लागलें तर मी येथून निघून जातें, कारण माझं स्वप्न मोडेल, माझी मूर्ति भंगेल, माझा देव्हारा फुटेल, माझं अमृत नासेल, मी गरीब होईन, दुनिया पोरकी होईल. असा एक चमत्कारिक धाक मला वाटतो. कोणी आपल्या आईविषयीं बोलूं लागलें तर तुम्ही जसे ताडकन् उठून जाल, कांहीं अप्रिय कानीं पडण्यास नको व तें प्रेममांगल्याचें निधान भग्न व्हावयास नको, असंच माझं टीकाकारांच्या सान्निध्यानं होतं. वाटल्यास तें एक वेड म्हणा, पण तें आहे खरं.

गंगामाता पृथ्वीवर कशी आली, तिला कुणी आणलं, तिचा विस्तार किती, उगम कोठें इत्यादि गोष्टी प्रस्तुत सौंदर्यदर्शनाचे वेळीं तरी अप्रस्तुत वाटतात. गंगामाईचं पुढं काय होणार हेंहि सांगतां येत नाहीं. तरी पण माझ्या मनःपटलांत तिचं पडलेलं प्रतिबिंब मी घट्ट धरून ठेवणार आहें अगदीं!

## बा रा वा

प्रीत सांवळ्या मेघाची
वारीयानें रंगविली
एका बिजलीच्या भाळीं
जाळीं आठ्यांचीं पडलीं!

वीर वीर म्हणुनिया
शर लावला धनुला
सूतपुत्र म्हणुनिया
झालों हीन पांचालीला!

चांदण्यांना स्पर्शण्यास
फुका धांवाधांव केली
दंव-बिंदूंचीच माळ
गळां पडोनी रडली!

विडा बांधला प्रीतीचा
हट्ट माझा एकट्याचा...
—आणि विसरला विडा
काताविण रंगायचा!

स्वप्न-सुवासिनी आल्या
आल्या बारसें म्हणून
लगबगा परतल्या
झाला बारावा म्हणून!

—विजय सुराणा, (टी. वाय्, बी. ए.)

☆

# एल्गार

कु. **नीला शंकर बर्वे**, टी. वाय्. बी. ए.

पेंडशांची एल्गार कादंबरी म्हणजे विशुद्ध आणि उत्कट मित्रप्रेमाचें दर्शन घडविणारी एक कथा होय. रघु आणि कादर हे दोघे भिन्न धर्मीय आहेत; एक हिंदु तर दुसरा मुसलमान. पण त्यांच्या खऱ्याखुऱ्या, पवित्र मैत्रीला धर्मांचीं बंधनें माहीत नाहींत. हिंदु-मुसलमान दंग्याच्या वेळीं, ते परस्परांविरुद्ध लढावयास उभे राहतात; पण त्यांच्यामधील हा विरोध केवळ जमातीसाठीं आहे. मित्र म्हणून ते एकाच बाजूला आहेत. त्यांच्या मैत्रीच्या उज्ज्वल धारेंत, हिंदु–मुसलमान हा भेद कुठल्या कुठें विरून जातो. पेंडशांना सबंध कादंबरींत चित्र रेखाटावयाचें आहे तें ह्याच मैत्रीचें. त्यांना कथा सांगावयाची आहे ती ह्याच दोन सुशील जीवांच्या निर्मळ प्रेमाची. कादंबरीसाठीं निवडलेली ही कथा निश्चितपणेंच मनाचा ठाव घेणारी आहे. पण प्रत्यक्षांत ही कथा मनाचा ठाव घेते का, म्हणजेच कादंबरींत, ही कथा कलापूर्ण करून सांगण्यांत पेंडसे यशस्वी झाले आहेत का, ह्याचाच विचार ह्यापुढें करावयाचा आहे.

पेंडशांनीं ह्या दोघांच्या मित्रप्रेमाचें दर्शन विभिन्न प्रसंगांतून घडवलें आहे. त्यामुळें अर्थातच मित्रप्रेमाची ही भावना जिवंत वाटते. पेंडशांनीं त्या दोहोंच्या जीवनांतून टिपून घेतलेले प्रसंग फार मोठे, भव्य आहेत असें नाहीं; पण निवडलेल्या त्या छोट्या छोट्या प्रसंगांतून मैत्रीच्या उत्कटत्वाचा प्रत्यय सतत येत राहतो, अस्सल मैत्रीचें त्यांतून हुबेहूब दर्शन घडतें. प्रसंग लहान लहान, साधे असले तरी मित्रप्रेमानें ते न्हाऊन निघाल्यामुळें वाचकांचें अंतःकरण हलवून सोडतात. ज्या प्रसंगापासून हे दोन जीव एकत्र येतात आणि त्यांच्या मैत्रीला पहिला कोंब फुटतो, तो कादंबरींतील पहिलाच प्रसंग–रघु शाळेंतील अत्यंत उनाड मुलगा. आपली आत्या वारली म्हणून गृहपाठ करतां आला नाहीं, असें तो एकदा आपल्या शिक्षकांना सांगतो. रघूनें ठोकलेली शंभर नंबरी थाप लक्षांत आल्यावर, शिक्षक वर्गातील एका हुशार, शांत, प्रामाणिक मुलाबरोबर रघूच्या वडिलांकडे चिठ्ठी पाठवतात. तो हुशार मुलगा म्हणजेच कादर होय. घरीं गेल्यावर, आपल्या कडक, तापट वडिलांकडून काय भयंकर शासन मिळणार...हा विचार करीत रघु चाललेला असतो. इतक्यांत, कादर धांवत धांवत येतो आणि मास्तरांनीं दिलेल्या चिठ्ठीचे तुकडे करून टाकतो. आणि येथूनच त्यांच्या मैत्रीला प्रारंभ होतो. हा प्रसंग शाळकरी मुलांच्या जीवनांतील खऱ्या मैत्रीचा द्योतकच आहे. कादर आणि रघु यांच्या स्वभावांत जमीन--अस्मानाचें अंतर असूनहि कादरला रघूबद्दल ओढ वाटते, रघूहि त्याला साद देतो. सर्वस्वी विषम जगांत वावरणाऱ्या दोन व्यक्तींना एकमेकांबद्दल वाटणारी आत्मीयता, त्यांची प्रथम भेट पेंडशांनीं अतिशय कलात्मक रीतीनें रंगवली आहे. मैत्रीचा हा पहिलाच प्रसंग अतिशय चित्तवेधक आहे.

मैत्रीचें बीज रुजत जाऊन, ती मैत्री फोफावत कशी जाते, ते दाखवण्यासाठींहि पेंडशांनीं नेटक्या घटनांची निवड केली आहे, आणि मैत्रीचा सुंदर रीतीनें परिपोष झाल्याचें दाखविलें आहे. कादरवर साखरपेंडी सोडून मुंबईला जाण्याचा प्रसंग येतो. त्यावेळीं तो रघूला म्हणतो कीं, ' रघु, तूं इथं आहेस मियांची ( मिया हे कादरचे वडील ) काळजी घ्यावयाला, म्हणूनच मी मुंबईला जातों आहें...' कादरचे हे उद्गार, रघूबद्दलच्या मैत्रींतून उद्भवलेल्या दृढ विश्वासाचें चिन्ह होत. कादर कॉंग्रेसचीं कामें करतो, ह्यांत त्याची चूक होत असल्याचें रघु त्याच्या निदर्शनास आणून देतो आणि कादरला आपली चूक पटते; ती कशामुळें ? तर रघु -कादरमधील मैत्रीच्या चिवट धाग्यामुळेंच होय. आपली चूक दुसऱ्यानें दाखवली कीं, माणसें खवळतात; पण येथें चूक दाखवणारा रघु कादरला दुसरा वाटतच नाहीं; दोघे एकरूपच झाले आहेत. कादरला मुलगा होतो त्या वेळीं रघु त्या मुलाच्या बारशासाठीं कर्ज काढतो. ' मित्रासाठींच मी केवळ कर्ज काढलें– ' ह्या रघूच्या वाक्यांत निखळ प्रेमाखेरीज दुसरें काय आहे ? अशा प्रकारचे अनेक प्रसंग त्या दोघांतील प्रेमाच्या भरतीचे वाढत जाणाऱ्या मित्रप्रेमाचे म्हणून सांगतां येतील. येथें थोडक्यांत सांगावयाचें तें इतकेंच कीं, निरनिराळ्या घटनांद्वारें मित्रप्रेमाचा परिपोष करण्यांत पेंडसे यशस्वी ठरले आहेत.

ह्या मैत्रिचा ठसा अधिक खोलवर मनांत उमटतो तो पेंडशांनीं त्या मित्रप्रेमाला घेतलेल्या विरोधी पार्श्व-

भूमीमुळें होय. रघूचे वडील–अण्णा अत्यंत हेकट, दुराग्रही आहेत. हिंदूंच्या घरीं मुसलमानांचा प्रवेश होणें त्यांना खपत नाहीं. ' कुठं आहे गधडा....मेला तरी फिकीर नाहीं....' असे उद्गार संतापानें ते काढतात. अर्थातच त्यांच्या या आक्रस्ताळी स्वभावामुळें रघु-कादरच्या मैत्रीला अनेकदां विरोध होतो. रघूच्या बहिणीच्या लग्नांत रघू कादरला बोलावतो पण अण्णांमुळें त्याचा अपमान होतो. कादरचे वडील रघूवर मुलाप्रमाणें माया करतात. कादरमुळें रघूच्या जीवनांत क्रांति घडते तरी देखील अण्णांना त्याचा घरोबा अमान्य असतो. 'माझ्या लग्नापेक्षां कादरच्या प्रतिष्ठेची किंमत मला जास्त आहे.' असें रघु कळवळून म्हणतो, तरी खाष्ट अण्णा, ' मला तिरडीवर बांध आणि खुशाल घरांत मुसलमान आण ' असें तुसडेपणानें म्हणतात. अशा प्रकारचें मैत्रीला विरोधी वातावरण असूनहि कादरची रघूशीं असलेली मैत्री तुटत नाहीं. मित्रप्रेमापोटीं कुठल्याहि प्रकारचा अपमान पोटांत घालण्याची त्याची तयारी असते. विरोधांतही अमर राहणाऱ्या प्रीतीला त्यामुळें आगळेंच तेज चढतें. अग्नि-दिव्य केल्यामुळें सीतेच्या व्यक्तिमत्वाची, पतिनिष्ठेची झळाळी जशी वाढते, त्याचप्रकारें जळजळीत विरोधांत खंबीरपणानें उभें राहणारें मित्रप्रेम मनावर कायमचा खोलवर परिणाम करून जाते. हिंदुधर्माबद्दलच्या कडवट, अतिरेकी दुराग्रहाच्या काळ्या लाटांची, खऱ्या माणुसकीला डावलून व्यावहारिक प्रतिष्ठेसाठीं तत्त्वाला जागणाऱ्या कृष्ण–वृत्तीची पार्श्वभूमि मिळाल्यामुळें, गंगेच्या प्रवाहाप्रमाणें धवल, शुभ्र असणाऱ्या मित्रप्रेमाचें, निर्मळ, उदात्त माणुसकीचें तेज अधिकच उठून दिसतें. अंधाराच्या पार्श्वभूमीवर संतत कोसळणारी पाण्याची धार जशी खुलून दिसते, तशीच मित्रप्रेमाची ही आकाशगंगा अधिकच चमकदार, तेजस्वी असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

हिंदु–मुसलमान हा भेद झुगारून देऊन अभंग राहणारें प्रेम कथेचा परिणाम वाढवतें. पण त्याच हिंदु–मुसलमान विरोधांचा कांहींसा प्रतिकूल परिणाम कादंबरीवर झालेला आहे. खऱ्या माणुसकीला जपणारे हे दोन मित्र ज्या संकुचित धर्मांची फिकीर करीत नाहींत, त्या धर्मांच्या लढ्यांतच कादरच्या मेंदूला दुखापत होते आणि पुढें त्यांतच तो मरतो. ज्याची आयुष्यभर तमा बाळगली नाहीं, त्यामुळेंच अखेरीं मरण येणें ही फार मोठी शोकांतिका आहे. पेंडशांना कदाचित् ह्यामुळेंच हिंदु–मुसलमान दंग्याचें वर्णन करण्याचा मोह झाला असावा. कादंबरीच्या प्रारंभींचें दादुमियाच्या यात्रेचें व दुर्गादेवीचें वर्णन हेंहि पेंडशांनीं जाणीवपूर्वक कथेचा परिणाम वाढावा म्हणूनच केलें असावें. पण त्यामुळें, कादंबरीचा परिणाम वाढत नाहीं, उलट कथानकांत निष्कारणच कृत्रिमता आली आहे. हिंदु-मुसलमान दंग्याचें वर्णन तर पेंडशांनीं इतकें विस्तारानें केलें आहे कीं, त्या धुमश्चक्रींत, खऱ्या प्रेमाचें पाखरूं कुठें तरी दडल्यासारखें वाटतें. ज्या मित्रप्रेमाचा परिपोष पेंडसे प्रारंभापासून करीत आले, त्या मूळ सूत्राला ह्या वर्णनांत गौण स्वरूप मिळाल्यासारखें वाटतें. लढा होऊन देखील मैत्रीला तडा जात नाहीं, हें दाखवण्यासाठीं पेंडशांनीं ह्या दंग्याचा उल्लेख केला, ह्यांत त्यांची कलात्मकताच प्रतीत होते. दंग्याच्या उल्लेखावर बिलकूल आक्षेप नाहीं, आक्षेप आहे तो लढ्याच्या विस्तृत, कांहींशा लांबलेल्या वर्णनावर होय. हें वर्णन पेंडशांनीं प्रभावी रीतीनें जरी केलें असलें तरी तें अप्रमाणबद्ध वाटतें. दोन सुशील जीवांची प्रेमकथा सांगतांना, दंग्याच्या वर्णनाला जरा आंवर घालायास हवा होता. दादुमियाच्या यात्रेच्या वर्णनाबाबतहि हेंच घडलें आहे. यात्रेच्या वर्णनापुढील कथा अतिशय परिणामकारक असूनहि, यात्रेच्या कांहींशा कंटाळवाण्या वर्णनामुळें, कादंबरीबद्दल थोडा गैरसमज निर्माण होतो. वर्णनाबाबतचें प्रमाण असें बिघडलें नसतें तर पेंडशांची

## पूर्ति—

असा फुटतो कागद
शाई पसरे सभोतीं
पाठपोट लिहवेना
आर–पार शब्दतती ॥ १ ॥

स्फुरतात अस्फुटसे
भाव कितीक मनांत
व्यक्त करूं तरि कसे–
आरपार भावगीत ॥ २ ॥

घेतां दुसरा कागद
आणि लेखणीही हातीं–
मन उन्मनीं वदतें...
" अव्यक्तां "त माझी पूर्ति !! ॥ ३ ॥

—कु. उषा तगारे
( तृ. वर्ष साहित्य )

ही कादंबरी पुष्कळच वरच्या पातळीला गेली असती. कारण सबंध कादंबरी अखेरीं अस्सल कलेचा आकार धारण करते तो निरनिराळ्या अवयवांच्या सुंदर आणि प्रमाणबद्ध रचनेंतूनच होय. त्यांत एखादा अवयव जरी प्रमाणापेक्षां मोठा झाला तरी सौंदर्यांत हिणकसपणा यावयाला प्रारंभ होतो. ह्याच दृष्टीनें 'एल्गार' कादंबरींतील वर्णनाचा विस्तार प्रमाणाबाहेर झाल्यामुळें कादंबरीच्या रेखीव घडणींत उणेपणा आणणारा ठरला आहे.

अप्रमाणबद्धतेचा दोष ह्या कादंबरींतील व्यक्तिचित्रणाबाबतहि दिसून येतो. रघूच्या व्यक्तिचित्रणावर पेंडशांचें जितकें लक्ष आहे, तितकें लक्ष कादरच्या चित्रणावर राहिलेलें नाहीं. दोन जीवांच्या मित्रप्रेमाचें वर्णन *करीत असतां, वास्तविक दोघांच्या व्यक्तिचित्रणावर* सारखाच भर देणें आवश्यक होतें. पण पेंडशांनीं कादरची व्यक्तिरेखा रघूच्या मानानें पुसटच रंगवली आहे. रघु-कादरच्या पहिल्या भेटींत चिठ्ठी फाडून कादर निघून जातो आणि त्याची दूरवर दिसणारी अस्पष्ट आकृति रघु पाहत उभा राहतो. कादरच्या आकृतींत धुसरता रघूप्रमाणें वाचकांनाहि जाणवत राहाते. कादरपेक्षां कादरच्या वडिलांच्या चित्रणावर लेखकाचा भर अधिक आहे, असेंहि कादंबरी वाचून वाटतें. दोन्ही मित्रांच्या वडिलांच्या स्वभावांतील विरोध रेखाटण्यासाठीं मियांचें चित्रण आवश्यक आहे हें खरें आहे; पण कादंबरीच्या नायकापेक्षां त्यांच्या चित्रणाला कमी स्थान देणें हें अधिक खरें आहे. पण ह्या कादंबरींत पार्श्वभूमि व ज्या व्यक्तीसाठीं ही पार्श्वभूमि रंगवली ती व्यक्ति, त्यांच्या चित्रणाच्या प्रमाणांत उलटापालट झालेली आहे.

ह्या ठिकाणीं अखेरीं एवढेंच सांगावेसें वाटतें कीं, एल्गार कादंबरींत, कादंबरीकाराला आवश्यक असणारे सुटे सुटे गुण पेंडशांच्या ठायीं आहेत, ह्याचा प्रत्यय येतो, *पण सर्व घटकांना एकत्र आणून त्यांची सुंदर* आकृति रंगवतांना लागणाऱ्या प्रमाणबद्धतेचा अभाव त्यांच्या कलेंत आहे हेंहि निदर्शनास येतें. सर्व गुण सुट्या स्वरूपांत असूनहि अस्सल कलेला अवश्य असणाऱ्या सुश्लिष्टतेची, प्रमाणबद्धतेची उणीव ह्या कादंबरींत असल्यामुळें ती कलेची उच्च पातळी गांठू शकलेली नाहीं.

* * *

## स्वप्नांत तुझ्या मी विरलों ग—

**अवचित सखये पहांट होतां**
**स्वप्नांत तुझ्या मी विरलों ग ॥ ध्रु० ॥**

**पहांट वारा वाहूं लागतां**
**फुलवेली ही फुलली ग**
**गंध तयांचा दरवळतां**
**भृंग मनाचा भुलला ग ॥ १ ॥**

**मन्मनाच्या क्षितिजावरतीं**
**रंग गुलाबी फुलूं लागतां**
**मनांत किलबिल सुरू जाहली**
**स्मरणीं तुझ्या मी रमलों ग ॥ २ ॥**

**भाव फुलांच्या सौहार्दानें**
**वेल प्रीतीची सजली ग**
**प्रेम-दंवाच्या स्पर्शसुखानें**
**लज्जित होऊनि हसली ग ॥ ३ ॥**

**निळ्या नभाच्या निळाईत सखी,**
**उषःप्रभेचे रंग उमटतां**
**उमलुनि आला रम्य गारवा**
**हृदयीं होई खळबळ ग ॥ ४ ॥**

**—रवींद्र घवी** ( पदवीपूर्व साहित्य )

# नमुना

कु. माणिक सरदेसाई,
एफ्. वाय. बी. ए.

'आनंदीबाई गर्ल्स् हायस्कूल' ही पुण्यांतील एक प्रसिद्ध शाळा होती. बहुतेक सगळे पालक आपल्या पाल्याला मराठी चौथीनंतर याच शाळेंत सात वर्षे अडकवीत असत. आनंदीबाईनें 'ध'चा 'मा' करण्याचा दुष्टपणा दाखविला होता. तरी तिच्याजवळ स्वभावाची पारख, महत्त्वाकांक्षा, सडेतोडवृत्ति, स्तुति करणें, दुसऱ्याला वश करण्याचा स्वभाव, परिस्थितीचें अचुक ज्ञान हे गुणही होते. दुर्गुणाकडे दुर्लक्ष करून फक्त गुणग्राही व्हावं असा शाळेच्या नांवांतला उच्च उदात्त अर्थ एक दिवस अस्मादिकांच्या पालकांनाही साक्षात्कारासारखा जाणवला. आणि शाळेला एक गुणवान् 'रत्न' लाभलं.

शाळेचीं सातही वर्षे निरनिराळ्या मैत्रिणींच्या नमुनेदार अनुभवांमुळें अगदीं अविस्मरणीय ठरलीं. इयत्ता नववीमध्यें शिकत असतांना माझ्या शेजारीं एक 'छाप-' मुलगी बसायची. किशोरी किरकिरे तिचं नांव ! तिच्या वडिलांनीं तिला 'बाईंच्या तोंडचा प्रत्येक शब्द मौल्यवान असतो म्हणून तो उतरवावा' असा मौलिक उपदेश केला होता. वडिलांचा उपदेश ती अगदीं तंतोतंत पाळत असे. त्यामुळें शाळेचे सातही तास तिची मान खालीं असे. आणि हात धावत असे.

एक दिवस सुटीमध्यें मी तिच्या वह्या बघायच्या ठरवल्या आणि ती बाहेर जातांक्षणींच मराठीची वही उघडली. अन् मला एकदम दिव्य ज्ञान प्राप्त झालं. पहिल्याच पानावर लिखाणावळीला सुरुवात केली होती.

'केकावलि'—मोरोपंत.

बाई—मुलींनो, कारखानीसच्या वडलांचें जें नांव आहे तेंच या कवितेच्या कवीचें आहे. मोराच्या ओरडण्याला केका असं म्हणतात. बेलबागेंत किंवा पेशवेपार्कमध्यें तुम्हीं मोर पाहिला असेल आणि ऐकलाही असेल. ऐकलाही असेल ! अशांसारखीं वाक्यें इंग्लिशमध्यें असतात. मराठीबरोबर इंग्लिशचा अभ्यास देखील झाला तर बिघडायचं नाहीं बरं ! तर मी काय सांगत होतें कीं, 'कवि हा परमेश्वराजवळ अत्यंत कळकळीनें विनवण्या करीत आहे. ए गोडबोले, आजची हजेरी घेतलीसना ? आणि हें बघ ही फी घे आणि कचेरींत जाऊन भरून ये पाहूं. काळे उशीरा फी आणलीस ना ? मग २ आणे दंड आण उद्यां. हं तेव्हां पतित म्हणजे पापी. कवि म्हणतो मला अजून परमेश्वर भेटला नाहीं. मग मी पापी नाहीं का ? मुलींनो, मोरोपंतांबद्दलची माहिती आपल्याला १३ व्या धड्यांत येणारच आहे तेव्हां आतां कवीबद्दल सांगायला नकोच. ए, कोपऱ्यांतली कोण ग ती ? लक्ष दे पाहूं अभ्यासाकडे. काय ग साठे, तूं आमच्या पलीकडच्या वाड्यांत राहतेस वाट ? परवां बघितलं मी तुला. येईन कधीं तरी तुझ्या घरीं तुझं गाणं ऐकायला ! शिक्षक आणि विद्यार्थी यांनीं एकत्र आलं कीं, मगच एकमेकांबद्दल खरी आस्था वाटूं लागते. कवि म्हणतो कीं, परमेश्वराजवळचा कृपेचा हंडा रिकामा झाला का ? मधल्या दोन ओळी अगदीं सोप्या आहेत. त्या तुम्हाला कळतीलच. साने आलीस का फी भरून ? पांचव्या तासाला टीचर्स रूममध्यें येऊन माझ्याकडून पावत्या घेऊन जा वाटायला. जा बस जागेवर. काय ग, गोडसे विषक्षीर हा समास कोणता ? कांदे घालून केलेले पोहे सारखा ? हें काय उत्तर झालं ? तूं अगदीं अक्कलशून्य मुलगी आहेस. असलीं उत्तरं द्यायचीं असलीं तर घरीं भांडीं घासत बसावं. तेवढंच आई वडलांचे पैसे वाचतील. तेव्हां विषानें युक्त क्षीर हा मध्यम पदलोपी समास आहे. भावे, विषाद म्हणजे काय ग ? मागच्या कवितेंत गेला आहे हा शब्द, तेव्हां सांगता आला पाहिजे अर्थ. अशी मख्खासारखी उभी काय राहिली आहेस ? एवढं साधं येत नाहीं ? तुझा तिसरा मजला अगदीं रिकामा आहे बघ. पारखी, ओळीचा अर्थ सांग बघूं. तोंड लपवूं नकोस बाकाखालीं.

अहो मिस्टर गोंधळेकर, शेजारच्या वर्गावर तुमचा तास आहे का आतां ? एक्स्क्यूज मी हं. जातांना दिसलांतच म्हणून विचारलं. अहो माझा पण तिथंच कसा मग ? परवा वेळापत्रक बदललं आहे. पाहून यायला हवं नाहीं ? गोंधळेकर, तुमचा वर्ग आमच्यां वर्गाइतका मद्द नसेल नाहीं का ? कसं शिकवायचं हेंच कळत नाहीं अहो इथं ! आपण मर मर सबंध तासभर डोकेफोड करून कविता शिकवावी तर पालथ्या घड्यावर पाणी असतं सगळं ! नाचायला कशा एका पायावर

तयार असतात. आणि अभ्यासावर पाणी सोडायला मात्र दोन्ही पायावर तयार ! कायहो, तुम्ही म्हणे सायन्स क्लबचे प्रमुख आहांत; मग आम्हाला फिस्ट पाहिजे बरं का ? म्हणा तुम्ही कसले फिस्ट देता ? अहो साधं मुलीच्या लग्नाची फिस्ट मागितली तीसुद्धां देत नाहीं मग हें तर राह्यलं बाजूलाच. ए कार्ट्यांनो, गप्प बसा कीं इथें काय मंडई आहे ? जरा दोन मिनिटें माणूस कामासाठीं आलेलं तर त्याचं बोलणं देखील ऐकून देऊं नका. साने अग सेक्रेटरी आहेस ना ? मग स्वतःच काय गप्पा मारते आहेस ? गोंधळेकर ! या पोरी अगदीं उच्छाद आणतात हो. शाळेंत मुली, घरीं मुली, शिकवणीलाहि मुली. जिथें जावं तिथें मुली आणि जोडीला त्यांचा चिवचिवाट. आतां तुम्हीच बघा—आजच्या तासाला निम्मी कविता शिकवून व्हायला पाहिजे होती. पण तीनच ओळी शिकवून झाल्या. या मुली जर अशाच त्रास द्यायला लागल्या तर वार्षिक परीक्षेपर्यंत पाव पोर्शनही पुरा व्हायचा नाहीं. बघा वेळ झालीच. सत्य आहे अगदीं , हें बघा मुलींनो, पुढच्या तासाला कविता घेईन. घरून चांगली दहा वेळां वाचून या. चला हो गोंधळेकर ! '

मी डोकं दोन्ही हातांनीं गच्च धरून ठेवलं. आवंढा गिळला आणि भूगोलाची वही उघडली. भूगोलासकट म्हसकर बाईनाही त्यांत उतरवलं होतं.

'मुलींनो, आज आपण पृथ्वीची माहिती घेणार आहोंत. पृथ्वीचा आकार तुमच्या चांगलाच परिचयाचा आहे. तुमच्या पेपरांवरच्या मार्कांच्या दोन टोकांना थोडासा चपटा असतो एवढंच ! काय ग भोपळे ? ' म्हणजे कसा ? ' विचारायला लाज नाहीं वाटत ? अग तुम्हाला कळावं म्हणून मी तुमच्या परीचयाचं उदाहरण सांगितलं तरी डोक्यांत शिरत नाहीं ? त्या नरेश वर्देच्या क्लासमध्यें जाता ना तडफडत भूगोल शिकायला ? तिथं नाहीं वाटतं, पृथ्वीचा आकार सांगितला ? खरं म्हणजे हे क्लासेस अगदीं प्रथम बंद करायला पाहिजेत. पैशापरी पैसे जातात आणि या भोपळ्यांमध्यें शिरत नाहीं तो नाहींच पृथ्वीचा आकार ? हं ऐका मुकाट्यानं. पृथ्वीचा आकार वाटोळा आहे. ती परप्रकाशित आहे. परप्रकाशित म्हणजे दुसऱ्याकडून प्रकाश मिळणें. हा दुसरा तिसरा कोणी नसून आपला सूर्य आहे. खरंच आज मी गृहपाठाच्या वह्या आणल्या आहेत तपासून. प्रत्येकीची वही अगदीं प्रदर्शनांत ठेवायला पाहिजे. निरनिराळ्या लिप्यांचे शोध लावल्यासारखीं अक्षरं आहेत. फक्त ज्योतीनं सुंदर अक्षरांत संपूर्ण माहिती देऊन गृहपाठ लिहिला आहे. भूगोल शिकण्याची पात्रता फक्त तिच्याच अंगांत आहे. बाकीच्यांची नुसती बाकांना शोभा ! ज्योति, हे बघ इंग्लिश नाटकांत काम करायला मीं तुला घेतलं आहे. सिंड्रेलाचं काम तूं करायचं आणि संगीतिकेचीं गाणीं म्हणायला देखील तूंच ये. आतां तिसऱ्या तासाला गाण्याच्या वर्गांत जा. तिथें करंदीकर तुझी प्रॅक्टिस घेतील. बेलापूरकरचा आवाज चांगला आहे का ? मग तिलाही घेऊन जा. बोरकर, जरा दहावीच्या चारी तुकड्यांत सांगून ये ग मी उद्यापासून पंधरा दिवस पी. टी. घेणार नाहीं म्हणून. जोशी, वेण्या वर बांध. त्या लोंबत ठेवलेल्या मला आवडायच्या नाहींत. पेंडसे, माझी ७ वीच्या वर्गांत छत्री आणि पर्स विसरली आहे ती घेऊन ये ग चटकन. बेंद्रे, तुझी गृहपाठाची वही विसरली कशी ? मला विसरलेलं आवडत नाहीं माहीत नाहीं वाटतं ? पृथ्वीच्या मध्यांतून गेलेल्या काल्पनिक रेषेला आस असं म्हणतात. खरे, त्या भिडेला आत्तां 'आस का पंछी'ची गोष्ट सांगायचं कांहीं अडलं नाहीं बघ ! शाळा सुटल्यावर रगड वेळ आहे गोष्टी सांगायला आणि काय ग ॲटलास आणला नाहींस वाटतं ? आज तूं ॲटलास आणला नाहींस म्हणून सगळ्या वर्गाला शिक्षा ! मी उरलेला तास शिकवणार नाहीं. कोण ग ती हळूंच टाळ्या वाजवते आहे ? लाजही नाहीं वाटत मेल्यांना ! थांबा इथें अशी बसून बघत रहाते. अग ए किरकिरे, मूर्खासारखं उतरवते आहेस काय ? मी कांहीं अभ्यासाचं बोलत नाहीं, उतरवून घ्यायला. अक्कलशून्य मुलगी...

पुढें वहीवर शाईच्या आणि अश्रूंच्या पुसट खुणांशिवाय कांहीं नव्हतं. सुट्टी संपल्याची घंटा वाजूं लागली. माझ्याच डोक्यांत कुणीतरी घण मारतंय असा मला भास व्हायला लागला. मी दप्तर भरकन् गळ्यांत अडकवलं आणि त्या द्रुतगति कारकुनाचा शेजार सोडून एकदम शेवटचा स्वतंत्र बांक गांठला.

# स्वप्नवासवदत्तम् सुखान्त कीं दुःखान्त ?

सौदामिनी बहुलीकर, टी. वाय्. बी. ए.

" भासनाटकचक्रेऽपि च्छेकैः क्षिप्ते परीक्षितुम् ।
स्वप्नवासवदत्तस्य दाहकोऽभून्न पावकः ॥ "

अशी ज्याची महती गाइली जात आहे, तें 'स्वप्नवासवदत्त' सर्वच दृष्टींनीं अलौकिक आहे. स्वतन्त्र प्रतिभा, कल्पनाशक्ति, रूढ संकेत आणि परम्परा यांची कौशल्य पूर्ण सांगड भासानें घातलेली आहे. वरवर पाहतां रूढींच्या बाहेर न जाणारें पण जरा खोलवर पाहिल्यास रूढींचीं बंधनें झुगारणारें असें एकमेव क्रान्तिकारक नाटक म्हणून स्वप्नवासवदत्ताकडे पाहतां येईल.

संस्कृतमध्यें शोकान्त नाटकें प्रायः नाहींत. अर्थात् याची कारणमीमांसा निरनिराळ्या पद्धतींनीं करण्यांत येते. भारतीयांचा आशावादी दृष्टिकोण हें एक याचें प्रमुख कारण सांगण्यांत येतें, आणि अर्थातच जीवनाचें प्रतिबिंब साहित्यांत पडत असल्यास नवल नाहीं.

दुसरें कारण असें, कीं नाट्य हें दृश्य आणि श्रव्य काव्य आहे. आबालवृद्ध जनता नाटक पाहणार; त्यामुळें कांहीं बन्धनें येणें अपरिहार्य आहे. म्हणून पाहणाऱ्याला लज्जाकर किंवा अतिशय भीतिप्रद असे प्रसंग टाळण्यांत येऊं लागले. नाटक पाहिल्यावर प्रेक्षकाला समाधान वाटलें पाहिजे. दुःख होता कामा नये. नाटकाच्या द्वारां नैतिक मूल्यें जोपासलीं गेलीं पाहिजेत, ही नाट्यशास्त्रज्ञांची कल्पना. कारण,

" नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् । "

जगांतील दुःखांना कंटाळून मनुष्य करमणुकीसाठीं नाटक पहावयास जातो. तेथेंही त्याला दुःखच पहावयास लावावयाचें का ? म्हणून नाटकांवर कांहीं बंधनें घातलीं गेलीं. त्यांपैकींच एक बन्धन म्हणजे—नाटक दुःखान्त नसावें. उच्च साहित्याचा आस्वाद घेतल्यानें रसिकाला होणारा आनंद विशुद्ध असतो, व कोणत्याही रसापासून—करुण रसापासूनही निर्मळ आनन्दच मिळतो, हें जरी रसध्वनिवादी आचार्यांना मान्य असलें आणि त्याप्रमाणें नाटकांत करुणरसाचा परिपोषही करण्यांत येत असला, तरीसुद्धां करुणरसप्रधान नाटकही शोकपर्यवसायी होऊं नये, असा दण्डक आहे.

यामुळें संस्कृतांतील नाट्य–साहित्यावर असा आक्षेप घेण्यांत येतो, कीं त्यांत वैविध्य नाहीं. वैचित्र्य नाहीं. तोचतोचपणा फार आहे. इतर वाङ्मयांत आढळणारें मनुष्य स्वभावाचें सूक्ष्मदर्शन आपल्याला संस्कृत नाटकांत आढळत नाहीं. पाश्चात्य वाङ्मयांत निरनिराळ्या धर्तींचीं नाटकें आहेत. एकट्या शेक्सपीयरचींच नाटकें घेतलीं तरी त्यांत मानवी स्वभावाचे विविध पैलू निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळ्या प्रकारें दिसून येतात. त्याप्रमाणेंच जीवन आहे. तसेंच तें रंगविण्यांत त्यांचा धीटपणा, वास्तववाद दिसून येतो. उलट, संस्कृत नाटकांत मात्र जीवनांतील दुःखांना शेवटपर्यंत तोंड दिलेलें दिसत नाहीं. संस्कृत नाटकांत प्रतिभेच्या उत्तुंग भराऱ्या, भव्य कल्पनाविलास, वैभवशाली चित्रें असतील, पण त्यांतील वृत्ति थोडीफार स्वप्नाळू, कातर आहे. त्यांना शेवटीं दुःख असावें हें सहन होत नाहीं.

यांतील पहिला आक्षेप बऱ्याच अंशीं पटणारा आहे. पण दुसरा मात्र युक्त वाटत नाहीं. कारण जगांतील सर्वच लोकांची प्रवृत्ति सुख शोधण्याकडे असते व संस्कृत नाटकांत ती दिसते, यांत वावगें कांहींच नाहीं. उलट भारतीयांचा आशावाद त्यांत दिसतो.

याप्रमाणें संस्कृत नाटकें शोकान्त न करण्याचीं कारणें कांहींहि असलीं तरी त्यामुळें वैविध्य कमी झालें आहे हें खरेंच ! करुणरसाचा सम्राट भवभूतिसुद्धां या संकेतांतून सुटूं शकला नाहीं. उत्तररामचरितांत करुणरसाचा परिपूर्ण परिपोष करून शेवट मात्र त्यानें सुखान्त केला आहे.

भास मात्र स्वप्नवासवदत्तांत निराळयाच पद्धतीनें लेखणी वापरतो व एकीकडे नाट्यतन्त्र, रूढि संभाळूनही नाटक सुखान्त करण्याचें टाळतो. अगदीं शान्तपणें. तरीही त्यांत आशावाद दिसत नाहीं असें नाहीं. त्यामुळें स्वप्नवासवदत्तांत सुखान्त आणि दुःखान्त अशा दोन्ही प्रकारच्या नाटकांचीं वैशिष्ट्यें दिसतात. वरवर पाहतां आपल्याला हेंही नाटक इतर नाटकांप्रमाणेंच आनन्दपर्यवसायीच आहे, असें वाटेल; पण तें तसें नाहीं. कांहीं

प्रमाणांत दुःखान्त व कांहीं प्रमाणांत सुखान्त असें संमिश्र स्वरूपाचें हें नाटक आहे.

भासानें रंगविलेली उदयन-वासवदत्तांचीं चित्रें श्रीहर्षाच्या उदयन-वासवदत्तांपेक्षां फारच भिन्न आहेत. स्वप्नवासवदत्तांतील उदयन हा एकनिष्ठ प्रेमाचा आदर्श म्हणतां येईल, तर रत्नावली व प्रियदर्शिका यांतील उदयन हा भ्रमरवृत्तीचा दिसतो. त्यामुळें भासाचा सात्विक उदयन अधिक छाप पाडतो. तीच गोष्ट वासवदत्तेच्या बाबतींत आहे. भासाची वासवदत्ता पतिनिष्ठ, त्यागी, संयमी अशी आर्य स्त्री आहे. ती पतीसाठीं स्वतःच्या सुखाची होळी करावयासही तयारी आहे. तिची हळुवार मनोवृत्ति आपल्याला स्वप्नवासवदत्ताच्या पानां-पानांतून बोलतांना दिसते. याउलट रत्नावली आणि प्रियदर्शिका यांतील वासवदत्ता ही मत्सरी राणी दिसते. त्यामुळें स्वप्नवासवदत्तांतील सौजन्यमूर्ति वासवदत्ता मनाला अधिकच चटका लावते.

नाटक सुखान्त कीं दुःखान्त हें ठरविण्याचे दोन प्रमुख निकष सांगतां येतील. ते म्हणजे-नाटकाचा नायक किंवा नायिका यांच्या दृष्टीनें होणारा शेवट आणि नाटक पाहिल्यानंतर प्रेक्षकांच्या मनावर होणारा परिणाम. या दृष्टीनें पाहिल्यास 'स्वप्नवासदत्त' हें इतर नाटकांपेक्षां वेगळें रहातें. व याचें कारण 'स्वप्नवासवदत्तांतील' वासवदत्तेची सात्त्विक, त्यागी व्यक्तिरेखा.

"स्वप्नवासवदत्त" हें नायिकाप्रधान नाटक आहे. याची नायिका वासवदत्ता आहे. इतर सर्व पात्रें तिच्या व्यक्तिरेखेपुढें गौण आहेत. तीच नाटकाचा केन्द्रबिन्दु आहे. वासवदत्तेच्याच सुखदुःखाभोंवतीं सर्व कथानकाची गुंफण झाली आहे. नाटकांतील सर्व पात्रांच्या सर्व कृति तिच्याच सुखदुःखाला कारणीभूत होतात.

ही वासवदत्ता त्यागमयी, एकनिष्ठ सौजन्यमूर्ति आहे, त्यामुळें वाचकाला विरघळून टाकण्याचें सामर्थ्य तिच्या व्यक्तिरेखेंत उतरलेलें आहे. आपल्या पतीचें गेलेलें राज्य परत मिळावें म्हणून मोठाच धोका पत्करून तिनें वनवास काढला आहे. अज्ञातवासांत राहिल्यानें येणाऱ्या संकटाची कल्पना असूनहि तिनें सर्वस्वावर पाणी सोडलें आहे. तिला यौगन्धरायणाचें कारस्थानही संपूर्ण माहीत नाहीं. फक्त स्वतः दूर जावयाचें एवढेंच तिला माहीत आहे. पण स्वतःच्या प्रेमांत दुसरी स्त्री भागीदार होईल याची तिला अन्धुकशीही कल्पना नाहीं. अगदीं पद्मावती-जवळ राहिल्यावरही तिला कल्पना नाहीं आणि जेव्हां अचानक पद्मावतीचा विवाह उदयनाशीं ठरल्याचें समजतें, तेव्हां मात्र-"आर्यपुत्रोऽपि नाम परकीय संवृत्तः।" असें अगदीं तळमळून ती उद्‌गार काढते. तिच्या अंतः-करणाची सारी व्यथा त्यांत प्रकट झालेली आहे. त्यांतच पद्मावतीची कौतुकमाला गुंफण्याचा प्रसंग तिच्यावर ओढवतो, त्या सर्व उत्सवांत तिला संयमानें वावरावे लागतें. पण यौगन्धरायणाच्या प्रतिज्ञेच्या आठवणीनें ती त्यांतूनही तावून सुलाखून निघते. व शेवटीं आपल्यामागें उदयनाच्या तोंडून

"पद्मावती बहुमता मम यद्यपि रूपशीलमाधुर्यैः।
वासवदत्ताबद्धं न तु तावन्मे मनो हरति॥"

असे उद्‌गार ऐकल्यावर त्याहि परिस्थितींत "दत्त-वेतनमस्य परिखेदस्य।" असे समाधानाचे उद्‌गार तिच्या तोंडून निघतात. यावरून तिच्या निरागस अन्तः-करणाची ओळख पटते. त्यामुळें तिच्याविषयीं अधिकच अनुकम्पा, सहानुभूति वाटत राहाते. तिच्या सुदैवानें तिला या परिश्रमाचें बरेंच फळ पुढें मिळतें. या ठिकाणीं दिसणारें भासाचें कौशल्य अपूर्व आहे. वासवदत्तेच्या मनांतील बारीकसारीक आन्दोलनेंही चित्रित करण्यांत भासानें मोठेंच यश मिळविलें आहे.

पण हें नाटक संपूर्ण वाचल्यावर वाचकाच्या मनावर काय परिणाम होतो, वासवदत्तेला निर्भेळ सुख मिळालें असें वाटतें काय? याचें उत्तर "नाहीं" असेंच द्यावें लागेल. वासवदत्तेच्या सहनशीलतेबद्दल कौतुक वाटतें,

## जाग—

आकाशाच्या घरठ्यांत
तारा पांखरें निजलीं,
अंधाराच्या कुशींत,
दाही दिशांनीं वेढलीं.

आकाशाच्या घरठ्यांत
चिवचिव थांबलेली
झोप खठ्याळ चंद्राची
स्वप्नें चघळित आली!

आकाशाच्या घरठ्यांत
बदलती पक्षी कूस
अवनीच्या राज्यांत
जाग आली क्षितिजास!

—कु. **सुधा जोशी**
(टी. वाय्. बी. ए.)

सपत्नीशींही ती प्रेमानेंच वागते. पण सपत्नी असणें ही वासवदत्तेलाही दुःखाचीच गोष्ट होती. उदयनानें दुसरा विवाह करावा ही गोष्ट वासवदत्तेच्या दृष्टीनें खचितच सुखावह नाहीं.

" आधुनिक दृष्टीनें प्राचीन स्त्रियांच्या व्यक्तिरेखांकडे पाहणें योग्य नाहीं; वासवदत्तेला सपत्नी असल्याचें इतकें दुःख झालें असेल का ? " असा एक विचार आहे, पण खुद्द वासवदत्तेच्या तोंडींच असे विषाददर्शक उद्गार आढळतात. शिवाय पूर्वींहि सपत्नी असणें दुःखदायकच मानीत असणें स्वाभाविक आहे. अर्जुनानें सुभद्रेशीं विवाह केल्यावर द्रौपदीला विषाद वाटलेलाच आहे व मनुष्यस्वभावही पूर्णपणें बदलत नाहीं म्हणून वासवदत्तेला त्या घटनेचें दुःख होणें स्वाभाविक आहे.

उदयनाच्या दृष्टीनें नाटक सुखान्त ठरेल. पण त्याची व्यक्तिरेखा वासवदत्तेच्या मानानें गौणच आहे. वासवदत्ताच या नाटकांत प्रमुख आहे व तिच्याबद्दल मात्र शेवटीं अनुकम्पाच नेहमीं वाटत राहते. तिच्यासारख्या त्यागी स्त्रीला पूर्ण फल मिळालें नाहीं म्हणून मन चुटपुटत राहतें. तिला तिचें पूर्वींचें स्थान परत मिळतें हें एवढें सुख तिला मिळतें. पण पूर्वींसारखी ती सर्वस्वी सुखी नाहीं. पद्मावती तिच्या सुखांत वाटेकरी आहे. आपल्या मनावर परिणाम राहतो तो तिच्या त्यागाचा. नाटकाच्या शेवटापेक्षां सर्व नाटकांत सतत दिसणारा वासवदत्तेचा त्यागच डोळे दिपवतो. येणाऱ्या प्रसंगाचें ती हंसतमुखानें स्वागत करते. पण म्हणून तें नाटक सुखान्त म्हणतां येणार नाहीं. जर पद्मावतीचा विवाह उदयनाशीं न होतां प्रद्योतपुत्राशीं झालेला दाखविला असतां व तसें झाल्यानें उदयनाला दर्शकाची मदत मिळून वत्सराज्य परत मिळालें असतें—तर तें वासवदत्तेच्या दृष्टीनें सुखावह होतें. पण भासानें तसें न करतां वासवदत्तेचें सुख कमी केलेलें आहे. यावरून आपल्याला असें म्हणतां येईल कीं, भासाला हें नाटक सुखान्त—पूर्ण सुखान्त—करावयाचेंच नव्हतें. अन्यथा इतर उपायांनीं उदयनाला आपलें राज्य मिळवितां आलें असतें. शिवाय वासवदत्तेचा पिता महासेन यानें उदयनाला मदत केली नसती काय ? राज्य नसतांना दर्शकानें आपण होऊन पद्मावती उदयनाला कशी दिली ?—असे कांहीं आक्षेप घेतां येतील.

पण वासवदत्तेला स्वतःचें पूर्वींचें स्थान परत मिळालें ही गोष्ट तिच्या दृष्टीनें पुष्कळच आनन्दाची म्हणतां येईल. म्हणून हें नाटक पूर्ण सुखान्त किंवा पूर्ण दुःखान्त न म्हणतां त्याचें स्वरूप संमिश्र मानावें असें वाटतें.

हें नाटक शोकान्त आहे, असें मानण्याचा प्रयत्न आणखी एका दृष्टिकोणांतून करण्यांत येतो. पद्मावतीच्या दृष्टिकोणांतून विचार केला तर हें नाटक शोकान्त मानावें. कारण उदयन—वासवदत्तांच्या प्रणयकथेंत पद्मावतीचा मात्र व्यर्थ बळी पडला आहे. त्यावेळीं बहुपत्नीकत्वाची चाल असल्यानें वासवदत्तेला दुःख झालें असण्याचें कारण नाहीं असें एक मत आहे.

पण यावर असें म्हणावेसें वाटतें कीं, कांहीं झालें तरी या नाटकांत वासवदत्ता ही नायिका आणि पद्मावती ही उपनायिका आहे. नाटकाच्या अन्तीं तें सुखान्त कीं दुःखान्त याचा विचार करतांना नायिकेच्या दृष्टीनेंच विचार केला पाहिजे. जर उपनायिकेच्या दृष्टीनें विचार केला तर अनवस्था ओढवेल. कारण कोणत्याही नाटकांत नायक, नायिका, उपनायक, किंवा उपनायिका किंवा खलनायक हा प्रायः असतोच व त्यांत नायकाचें सुख तें खलनायकाचें सुख होऊंच शकत नाहीं, किंवा उप-

...७

## सामसूम

' अरुण '

वठे वेल जीवनाचा
लागे ग्रीष्माचि चाहुल
सरलें हरित वैभव
आतां वणव्याचि चाल

आम्र मोहरला तेव्हां
साद तुझी ऐकून
सूर लोपले कुठें ते
सारें कसें सामसूम

चंद्रकोरहि हंसली
तुझ्या मुखचंद्रा पाहून
आज सलतसे रात
खोल अंतरीं रुतून

हर्ष सांगितला तुला
निवविलें माझें दुःख
नाहीं केली क्षिती कधीं
सूड घेई क्रूर जग

जळायाचें असे आतां
रक्षा होऊन कणकण
वर्षा येईल परंतू
नाहीं फुलायाचें मन !

नायिकेचें सुख, हें नायिकेचें सुख असेलच असें नाहीं. किंबहुना एकाचें सुख तें दुसऱ्याचें दुःख होण्याचाच संभव अधिक.

इतरही अनेक नाटकांतून आपल्याला हेंच दिसतें. उदा. मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय किंवा रत्नावली व प्रियदर्शिका—यांतही शेवट सारखाच आहे. मालविकाग्निमित्रांत धारिणी व इरावती या दोघीही मालविकेला विरोध करीत असतात आणि शेवटीं नाइलाजानें मालविका व अग्निमित्र यांच्या विवाहाला संमति देतात पण हें नाटक कांहीं शोकान्त म्हणतां येणार नाहीं. कारण यांतील नायिका मालविका आहे आणि तिच्या दृष्टीनें तें संपूर्णतः सुखान्तच आहे. त्याचप्रमाणें विक्रमोर्वशीयांतील पुरूरव्याची पहिली राणी—काशिराजकन्या—सात्विक असली तरी ती नायिका नसल्यानें नाटक सुखान्तच मानलें पाहिजे. कारण नायिका उर्वशी आहे. हीच गोष्ट इतर नाटकांविषयींहि म्हणता येईल.

## तिथें....

**वर हिरव्याल्या छाया,**
**खालीं निळें निळें पाणी,**
**तिथें वारा झिलमिल,**
**गातो चांदण्याचीं गाणीं ॥ १ ॥**

**फुलपांखरें उन्हाचीं**
**सोनपंखी उतरलीं**
**तिथें पानांफुलांवर,**
**नाचूं बागडूं लागलीं ॥ २ ॥**

**तिथें मुग्ध एकांताला,**
**पेंग गुलाबाची आली**
**पांखरांची किलबिल**
**मत्त सुगंधांत न्हाली**

**अशा कुठेंतरी तिथें**
**दूर... चुकावें मी वाट**
**—सहेतुक चुकलेल्या**
**तुझी घडायला भेट ॥ ३ ॥**

**—कु. शैला पटवर्धन**
(एफ्. वाय्. बी. ए.)

याचा निकष लावून पाहिला तर वासवदत्तेच्या दृष्टिकोणांतूनच या नाटकाकडे पाहिलें पाहिजे असें दिसून येतें. कारण ती प्रमुख व्यक्ति आहे, आणि तिच्याभोंवतींच सर्व कथानक फिरत आहे. आणि अशा दृष्टिकोणांतून पाहिल्यावर ' स्वप्नवासवदत्त ' सुखान्त मानतां येत नाहीं. शेवटींही वासवदत्तेच्या व्यक्तिरेखेंत एकप्रकारच्या कारुण्याची छटाच दिसते. अगदीं उत्तररामचरित्रांतही मूळ कथानकाला कलाटणी देऊन भवभूतीनें राम आणि सीता या दोघांच्याही दृष्टीनें शेवट सुखकारक केला आहे. पण स्वप्नवासवदत्तांत मात्र वासवदत्तेला शेवटींही त्यागच करावयास लाविला आहे. निर्भेळ सुख तिला मिळालेलें नाहीं किंवा मिळण्याची आशाही ठेविलेली नाहीं. पद्मावती मात्र सुखभावी दाखविलेली आहे.

अशी कांहीं तरी मर्यादा ठरविल्याशिवाय नाटक सुखान्त कीं दुःखान्त याचा निर्णयच होणार नाहीं. कारण भिन्न भिन्न दृष्टिकोणांतून एकाच गोष्टीचें स्वरूप निरनिराळ्या प्रकारचें होतें. व ही मर्यादा ठरवितांना नायक किंवा नायिका यांच्या दृष्टिकोणांतून नाटकाच्या स्वरूपाचा विचार व्हावा ही गोष्ट योग्य वाटते. कारण प्रमुख व्यक्तीच्या अनुरोधानेंच नाटककारानें आपल्या कथावस्तूचा विकास केलेला असतो. सर्वच वाङ्मयांत असें दिसून येतें कीं, कोठल्या तरी एका व्यक्तिरेखेभोंवतीं तिचा विकास करण्याच्या हेतूनें अनेक घटनांची मांडणी झालेली असते आणि अनेक पात्रांची योजना केलेली आढळते. प्रमुख व्यक्तीच्या व्यक्तित्वाचे पदर उलगडून दाखविण्यासाठीं अनेक प्रसंगांचें चित्रण केलेलें असतें व अशी कलाकृति एकसंध होते.

अर्थात नाटकाचा नायक कोण हें ठरवावयास हवेंच. पण स्वप्नवासवदत्तांत असा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. या नाटकांत वासवदत्ता ही नायिका, प्रमुख व्यक्तिरेखा आहे हें निःसंशय. त्यामुळें या नाटकाचें स्वरूप ठरविलांना पद्मावतीच्या दृष्टीनें विचार न करतां वासवदत्तेच्या दृष्टीनेंच केला पाहिजे. आणि असा विचार केला, तर या नाटकाचें स्वरूप संमिश्र—सुखान्त आणि दुःखान्त—ठरतें, अर्थात् त्यांतील कारुण्याचा परिणाम अधिक प्रभावी ठरतो.

याला इतर अनेक नाटकांचीं उदाहरणें देतां येतील. उदाहरणार्थ वेणीसंहारांत भीम, दुर्योधन आणि युधिष्ठिर हे तिघेही निरनिराळ्या निकषांनुसार नायक संभवतात. त्या प्रसंगीं युधिष्ठिराची व्यक्तिरेखा अगदींच गौण असल्यानें तो ताबडतोब बाजूस पडतो. पण भीम आणि दुर्योधन यांपैकीं जर भीम हा नायक आणि दुर्योधन हा खल-

नायक ठरला तर नाटक सुखान्त ठरेल. या उलट दुर्योधन नायक ठरला तर नाटक दुःखान्त ठरेल. याप्रमाणें निर्णय संशयांत राहील. मला वाटतें कीं, भीम हा वेणीसंहारांतील नायक असावा म्हणून दोघांच्याही व्यक्तिरेखा सारख्याच प्रभावी असल्या तरी नायकाच्या अनुरोधानेंच नाटकाचा शेवट कसा आहे, हें ठरवावें. अन्यथा निर्णय अशक्य आहे.

हीच गोष्ट मुद्राराक्षसाच्या बाबतींतही म्हणता येईल. यांत राक्षस आणि चाणक्य हे दोघे नायक म्हणून डोळ्यांपुढें उभे राहतात. अर्थात् त्यांतील नायक कोण हें ठरविल्याशिवाय नाटकाचें स्वरूप सुखान्त कीं दुःखान्त हें ठरवितां येणार नाहीं.

याप्रमाणें नाटकाचा स्वरूपनिर्णय आणि त्यांतील व्यक्तिरेखांचा गौणप्रधान भाव हे परस्पर संबद्ध आहेत आणि या निकषावर नाटकें जर तपासून पाहिलीं, तर परंपरेनें सुखान्त ठरविलेल्या ' स्वप्नवासवदत्ता ' सारख्या इतरहि कांहीं नाटकांचें स्वरूप निराळें ठरणें शक्य आहे.

वरील सर्व निकषांवरून 'स्वप्नवासवदत्ता'चें स्वरूप संमिश्र ठरतें आणि त्यामुळेंच तें अधिक परिणामकारक झालें आहे. "Variety is the spice of life." हें अगदीं खरें आहे. नुसता गोड पदार्थ खावयास नको वाटतो. त्याला कांहीं तरी तोंडी लावायला तिखट असलें कीं बरें वाटतें. ऊनसावलीचा खेळ अधिक आनंद देतो. सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसापेक्षां मधूनच येणाऱ्या श्रावणांतल्या सरी अधिक मनोहारी असतात. आंबट गोड फळांची चव बराच वेळपर्यंत आपल्या जिभेवर रेंगाळते म्हणूनच. ' स्वप्नवासवदत्ता ' हें इतर नाटकांपेक्षां निराळें असल्यानें अधिकच सरस वाटतें. संस्कृत नाट्यसाहित्यांत असें वेगळें पडणारें दुसरें नाटक म्हणून ' मुद्राराक्षसा'कडेही बोट दाखवितां येईल.

यावरून असें म्हणतां येईल कीं, भासानें रूढींच्या बंधनांतून मोठ्या कौशल्यानें वाट काढली आहे. संस्कृतांतील ' नाटकें सुखान्तच असावींत ' हा संकेत त्यानें कौशल्यानें इतरांना कळत न कळत दूर ठेवला आहे. म्हणजे त्यानें एकीकडे नाट्यतन्त्रही सांभाळलें आहे आणि दुसरीकडे आपला निराळेपणा दाखवून मोडलेंही आहे.

## पार विसरून जातें—

शांत चांदण्याचा रस
चंद्र पाजी अवनीला
धवलशा गगनांत
गातो गीत रोहिणीला...

गर्द नक्षत्र लतांना
रंग मखमली येतो
मोरपिशी झावळ्यांत
वारा रागदारी गातो

नील शशीच्या करानें
सागरास जाग येते
डोळे चोळीत चोळीत
लाट किनारीं बसते...

पाहूनी हा सारा खेळ
मन माझें भारावतें
क्षणिकशा जीवनाला
पार विसरून जातें...

वन्या साठे, ( टी. वाय्. बी. ए. )

## थंडीच्या ग लाटेमध्यें—

थंडीच्या ग लाटेमध्यें
धरती ही थरारते
रजनीच्या दुलईत
पहा कशी विसावते ॥ १ ॥

थंडीच्या ग लाटेमध्यें
चांदण्यांना कंप भरे
चांदोबाच्या शेकोटीला
घालूं लागल्या फेरे ॥ २ ॥

थंडीच्या ग लाटेमध्यें
कैफ चढला माडाला
पानाआड दडे कळी
वेल बिलगे झाडाला ॥ ३ ॥

थंडीच्या ग लाटेमध्यें
माझा जीव तळमळे
आठवतां तुझी प्रीत
धाव घेती घटीपळें ॥ ४ ॥

वसंत तुकाराम शिंदे, ( एस्. वाय्. बी. ए. )

( पान १६ वरून चालू )

( ७ ) प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणें तर्फे आंतर महाविद्यालयीन नाट्य वाचन स्पर्धेत आपल्या कॉलेजतर्फे तीन कलाकार संघांनीं भाग घेतला होता. त्यांनीं ' डॉ. कैलास ', ' छेड ' व ' वेगळं व्हायचंय मला ! ' या तीन नाटकांचें वाचन केलें. पुण्यांतील महाविद्यालयीन एकूण ११ संघांनीं स्पर्धेत भाग घेतला होता. त्यांत आपल्या महाविद्यालयीन संघाच्या ' वेगळं व्हायचंय् मला ! ' या नाटकाच्या वाचनास सांघिक पारितोषिकांत **प्रथम विजेतेपद** मिळालें, हें नमूद करण्यास आनंद वाटतो. याबद्दल त्यांत भाग घेणाऱ्या खालील कलाकारांचें आम्ही हार्दिक अभिनंदन करतों. ( १ ) कु. शैला पांडे, ( २ ) कु. आशालता जोशी, ( ३ ) मधु गोडबोले, ( ४ ) विष्णु साठे, ( ५ ) सुरेश गरसोळे, ( ६ ) सुधाकर वाघ व साहाय्यक रमाकांत परांजपे.

सदर स्पर्धेतील श्रेष्ठ वाचक प्रथम पारितोषिक कु. शैला पांडे यांना त्यांच्या ' सुलभा 'च्या भूमिकेच्या वाचनाबद्दल मिळालें आहे. याशिवाय प्रत्येक संघांतील वैयक्तिक पारितोषिकें खालील प्रमाणें मिळालीं आहेत.

'डॉ. कैलास'–(१) सु.बा. पाध्ये–'कैलास', 'बाबासाहेब'.
(२) बाळ पानवलकर–– 'काळे', 'हरबा'.
' छेड '— १ अशोक जोशी—' बंड्या '
२ नंदकुमार कारखानीस ' श्याम '
'वेगळं व्हायचंय मला'– १ कु. शैला पांडे––' सुलभा '
२ विष्णु साठे—'अप्पासाहेब', ' रमेश '

**शिवाजी जगताप**  
**कु. शैला पांडे**  
चिटणीस

**शं. रा. देशपांडे**  
कार्याध्यक्ष

## जिमखाना

( १ ) **क्रिकेट विभाग—**लीग सामन्यांत आपल्या संघानें अजिंक्य पद मिळविलें. कॅप्टन सदानंद मोहोळ यांनीं लीग मॅचेसमध्यें ७० विकेट्सचें स्वतःच प्रस्थापित केलेलें रेकार्ड मोडून नवें ७२ विकेट्सेचें निर्माण केलें. तसेंच इंटर कॉलेजिएट लीग मध्यें श्री. सुरेश पुरंदरे बॅटिंगमध्यें पहिला आला व श्री. मधु गुप्ते दुसरा आला. एकंदरींत गतवर्षींचीच यशपरंपरा संघ राखणार असें दिसतें.

( २ ) **भारतीय खेळ—**आपला खोखो व आट्यापाट्या संघ लीग सामन्यांत विजयी झाला आहे व ही परंपरा सातत्यानें तीन वर्षे टिकवीत आहे.

( ३ ) **जिम्नॅशियम्—**उत्साहानें केलेल्या सुरवातीस भरघोस यश आलें आहे व कुस्तींत चॅम्पियनशिप मिळाली आहे. श्री. जे. एस. माने व एल्. जे. गवळी हे विजेते ठरले आहेत आणि श्री. बी. जी. पाठक, एम्. बी. चव्हाण, वाय्. जी. पवार हे सेकंड बेस्ट आले. पोहण्याच्या स्पर्धेत श्री. ममदापूरकर ४०० व १५०० मीटरमध्यें तिसरे आले.

(४) **मायनर गेम्स––**टेबल टेनिस सामन्यांत श्री. बंडू कुलकर्णी व सुधीर फुलंब्रीकर यांचा संघ विजयी झाला आहे व श्री. बंडू कुलकर्णी यांची आंतरविद्यापीठ स्पर्धासाठीं पुणें–विद्यापीठ संघांतून खेळण्यासाठीं निवड झाली आहे.

( ५ ) **वादसभा––**अर्थमंत्री श्री. स. गो. बर्वे, महाराष्ट्र राज्य यांचें हस्तें १ ऑगस्ट रोजीं वादसभेचें उद्‌घाटन झालें व कार्यास सुरवात झाली. ' महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे'च्या वतीनें पुणें विभागांत झालेल्या हिन्दी वक्तृत्व स्पर्धेत श्री. घारपुरे पहिला आला.

( ६ ) **विद्यार्थिनी विभाग––**आपला संघ लीग सामन्यांत खोखो मध्यें विजयी झाला. आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस सामन्यांत कु. नीला कुलकर्णी सेकंड–बेस्ट आली व तिची पुणें विद्यापीठ संघाची कप्तान म्हणून निवड झाली. कु. मंदा डोंगरे, पोहण्याच्या ५० मीटर स्पर्धेत तिसरी आली.

( ७ ) **अभिनंदन व शुभेच्छा––**माजी स्पोर्टस सेक्रेटरी कु. नलिनी हुल्याळकर उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेला गेल्या. श्री. पी. पी. लेले, एल्. एल्. एम्. ला पहिले आले. श्री. एम्. डी. गुर्जर यांची पतियाळांतील नॅशनल स्पोर्ट्स इन्स्टिटयूटमध्यें असि. कोच म्हणून नेमणूक झाली. माजी क्रिकेट सेक्रेटरी श्री. हेमंत गोरे ' लॅंकेशायर लीग ' खेळण्यासाठीं इंग्लंडला गेले.

या सर्वांचें अभिनन्दन व पुढील कार्यांत शुभेच्छा.

**प्रा. डॉ. आर. व्ही. घाटे**  
अध्यक्ष

**वि. बा. पाटील**  
जनरल सेक्रेटरी.